# प्रकरण चार

## सामान्य प्रशासन विभाग

**4.1 पंचायत समिती सेस मधून संगणक, इन्व्हर्टर व प्रिंटर खरेदी.**

**पंचायत समिती सुरगाणा, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 56) -** पंचायत समिती सुरगाणा सन 2015-2016 या वित्तीय वर्षात पंचायत समिती सेस अंतर्गत संगणक, इन्व्हर्टर व प्रिंटर खरेदी करीता रक्कम रूपये 2,26,802/- खर्च केलेला आहे. उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पंचायत समितीने 1) पंससु/सा.प्रा.वि./प्रशा/266-अ,दिनांक15/03/2016 2) पंससु/सा.प्रा.वि./प्रशा/266-ब, दिनांक 15/03/2016 अन्वये मे.ए.एस.झेड इन्फोटेक नाशिक व मे. अमेया कॉम्प्युटर नाशिक यांना पुरवठा आदेश दिले. त्यात खरेदी करावयाचे संगणकांचे, प्रिंटरचे Configureation/specification नमूद केले नाही. त्यामूळे कोणत्या मेकचे संगणक व प्रिंटरचे आदेश दिले त्याची खात्री करता आली नाही. तसेच संगणकाचे Configureation/specification, नसल्याने दरकरारातील दराची खात्री करता आली नाही.

2) मे. अमेय कॉम्प्युटर नाशिक व मे.ए.एस.झेड इन्फोटेक नाशिक यांचे देयकातून विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई दिनांक 04/04/2012 च्या अधिसुचनानुसार मुल्यवर्धीत करासाठी नोंदणीकृत ठेकेदार असल्यास 2टक्के मुल्यवर्धीत कर रक्कम रुपये 4,536/- कपात करणे आवश्यक आहे. अन्यथा पुरवठादाराकडून 5 टक्के मूल्यवर्धित कर वसूल करावा.

3) मे. अमेय कॉम्प्युटर नाशिक व मे.ए.एस.झेड इन्फोटेक नाशिक यांचे देयकातून नियमानुसार आयकर रक्कम रुपये 4,536/- वसूल करण्यात आला नाही. पुरवठादाराचे pan card प्रत प्राप्त करावी. अन्यथा 20 टक्के आयकर कपातीची तरतूद आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.

4) मे अमेय कॉम्पुटर नासिक व मे.ए एस झेड इन्फोटेक, नाशिक यांचे देयकातून अनामत रक्कम रुपये 11,340/- वसूल करण्यात आली नाही

5) दरकरारा नुसार संगणकामध्ये अधिकृत सर्व softweres, antivirous यांची लायसन कॉपी व त्यांचा कालावधी तपशील इत्यादी दिले अगर कसे याची खात्री संगणक ताब्यात घेतांना केल्याचे दिसून येत नाही.

6) संगणक दरकरार मुदत दिनांक 09/02/2016 अखेर होती. मात्र, पुरवठा आदेश दिनांक 15/03/2016 रोजी देण्यात आले. दरकरारची पुढील अधिकृत मुदतवाढ प्राप्त करावी. अन्यथा बाजार भावाप्रमाणे किंमत खात्री करून तफावत रक्कम पुरवठादार यांचे कडून वसूल करावी.

7) दरकरार अटी व शर्ती नुसार संगणक पुरवठा झाले नंतर 90 टक्के व 10 टक्के रक्कम 60 दिवसात प्रदान करावयाची होती. त्यानुसार पंचायत समितीने कार्यवाही केली नाही.

**4.2 आदेशाप्रमाणे शास्तीची अमंलबजावणी न करणेबाबत.**

**पंचायत समिती धुळे, जिल्हा धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती कर्मचारी श्री.एम.आर.राठोड ग्रामसेवक यांच्या सेवापुस्तकांची पडताळणी केली असता सदर सेवापुस्तकात मुख्यं कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, धुळे यांचे कडील आदेश क्रमांक धुजिप/ग्रापं/2/चौ/362/12 दिनांक 23/08/2012 नुसार श्री.राठोड ग्रामसेवक यांना मुळ वेतनावर आणण्याची शिक्षा केलेली आहे. तसेच मौजे उडाणे, तालुका धुळे येथील इंदिरा आवास योजना अंतर्गत घरकुल लाभार्थी निवड करतांना अपात्र लाभार्थ्यांची निवड केल्याने त्यांचेकडुन रक्कम रुपये 3,66,500/- एकरकमी वसुल करावयाचे आदेश देण्यात आलेले आहेत. परंतु, सदरबाबत कार्यवाही केल्याचे आढळुन आले नाही. तरी याबाबत आदेशात नमुद प्रमाणे कार्यवाही करण्यात येऊन पुर्तता अनुपालन दर्शवावे.

**4.3 एकस्तर पदोन्नती योजनेअंर्तगत चुकीच्या वेतननिश्चीतीबाबत श्री. राजेंद्र भिका रामोळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी.**

**पंचायत समिती नवापूर, जिल्हा नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,78,399/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

श्री. राजेंद्र भिका रामोळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांची मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे पदोन्नती आदेश क्रमांक- जिपन/साप्रवि/आस्था-1/अ/1594/2010, दिनांक 29/12/2010 अन्वये कनिष्ठ प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती झाल्याने दिनांक 12/01/2011 रोजी हजर झालेले आहेत. त्यांची पदोन्नतीने पदस्थापना आदिवासी क्षेत्रात झाल्याने त्यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक टीआरएफ.2000/प्र.क्र.-3/बारा, दिनांक 06/08/2002 अन्वये एकस्तर पदोन्नती योजना लागू करण्यात आलेली आहे. त्यांना पदोन्नतीपुर्वी एकस्तर पदोन्नती योजना देय होती व एकस्तर योजनेअंतर्गतच्या वेतनावर पदोन्नतीची व त्यानंतर एकस्तर पदोन्नतीची वेतननिश्चीती केल्याने रुपये 3,78,399/- चे अतिप्रदान झालेले आहे.

**4.4 अंशराशीकरणाची रक्कम कपातीबाबत**

**पंचायत समिती शहादा, जिल्हा नंदूरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रूपये 58,726/- वसूलपात्र रक्कम नोंदविली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती शहादाचे सन 2015-2016 चे सेवा निवृत्ती प्रकरणाचे लेखापरीक्षण केले असता अंशराशीकरणाची रक्कम सेवा निवृत्ती आदेश प्राप्त झाल्यापासून तीन महिनेनंतर कपात केली पाहिजे. परंतू, पंचायत समिती शहादा येथे तशी कार्यवाही झालेली नाही. एकूण 9 सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे कपात केलेली नाही. सदर कमी कपात रक्कम रूपये 69,448/- वसूल करून शासन सदरी भरणा करावी.

**4.5 सरपंचांना नियमबाह्यरित्या सदस्य बैठक भत्ता अदा केलेबाबत.**

**पंचायत समिती आंबेगाव, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 49) -** पंचायत समिती आंबेगाव, सन 2015-2016 चे लेखापरीक्षणामध्ये ग्रामपंचायत विभागाकडील नस्तींचे लेखापरीक्षण केले असता, रक्कम रुपये 15,46,200/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम 2011/प्र.क्र.40/ पंरा-3, दिनांक 06/09/2014 नुसार ग्रामपंचायत सरपंच मानधन देण्याकरीता ग्रामपंचायतींना येणाऱ्या 75 टक्के खर्चाच्या प्रतीपुर्तीकरीता ग्रामपंचायतींना अनुदान दिले जाते. तसेच सदर शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत सदस्यांना दरमहा रुपये 25/- एवढा बैठक भत्ता अदा करण्याकरीता 100 टक्के अनुदान दिले जाते. पंचायत समितीने सदस्य बैठक भत्ता अनुदान वितरीत करतेवेळी एकुण सदस्य संख्येपैकी सरपंच संख्या वजा करुन सदस्य बैठक भत्ता अनुदान वितरीत करणे आवश्यक असताना, याप्रमाणे कार्यवाही न केल्याने खालील तपशिलाप्रमाणे रुपये 30,000/- चे जादा प्रदान झाले आहे. त्याची वसुली होवुन शासन खाती भरणा होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 21 अन्वये रक्कम मिळालेबाबतची ग्रामपंचायत नमुना नंबर 07 च्या पावतीची पोहोच दप्तरी नाही.

**4.6 सरपंच मानधन, सदस्य बैठक भत्ता व कर्मचारी किमान वेतन प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती इंदापूर, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समितीने सन 2015-2016 या वित्तीय वर्षामध्ये सरपंच मानधन, सदस्य बैठक भत्ता व कर्मचारी किमान वेतनापोटी वाटप केलेल्या रक्कम रूपये 1,06,42,800/- खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्तीय वर्षात गटामध्ये कोणत्याही ग्रामपंचायतीला प्रशासक नसल्याबाबतचे गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र बिलासोबत अथवा नस्तीला जोडल्याचे दिसून आले नाही.

2) बिलाला किंवा नस्तीला ग्रामपंचायतीचे उत्पन्न दर्शविलेले नसल्याने शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम.2009/प्र.क्र.-125/पं.रा.3, दिनांक 27/07/2009 नुसार सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्ता वाटप बाबतची खात्री करता आली नाही.

3) ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन शासन निर्णय ग्रामविकास विभाग शासन निर्णय व्ही.पी.एम.2699/प्र.क्र.206/पं.रा.3, दिनांक 21/01/2000 व शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम.2012/प्र.क्र.235/पं.रा.3, दिनांक 04/03/2014 अन्वये 100 टक्के व 75 टक्के वाढीव हिश्यास पात्र होण्यासाठी संबंधीत ग्रामपंचायतींनी नियमाप्रमाणे दर ४ वर्षांनी नियमाप्रमाणे फेर आकारणी करणे व आर्थिक वर्षासाठी मागणीच्या 90 टक्के वसुली करणे या निकषाचे पालन ग्रामपंचायतिनी केल्याबाबतची कुठलीच कार्यवाही नस्तीसोबत दिसून आली नाही.

4) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक 21/01/2000 प्रमाणे प्रथम ग्रामपंचायतने सरपंचाना मानधन व सदस्यांना बैठक भत्ता अदा करून त्यानंतर तेवढया रक्कमांची प्रतिपुर्ततेची मागणी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

5) कर्मचाऱ्याने नेमणुकीबाबत ग्रामपंचायतचे ठरावाची प्रत मागणी सोबत जोडणे आवश्यक असताना पूर्तता केलेली नाही.

**4.7 जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत ग्रामपंचायतींना जनसुविधासाठी विशेष अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती इंदापूर, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा वार्षिक योजनांतर्गत ग्रामपंचायतीना जनसुविधासाठी विशेष अनुदान वाटप अंतर्गत एकूण 13 ग्रामपंचायतीना रुपये 61,09,796/- एवढ्या निधीचे वाटप करण्यात आलेले आहे. सदर निधी वाटपाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पूर्ण कामांची उपयोगिता प्रमाणपत्रे व काम पूर्णत्वाचे दाखले नस्तीसोबत आढळून आले नाहीत.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ददभू.-2010/प्र.क्र.62/पं.स.8, दिनांक 16/09/2010 अनुक्रमांक 4(2) अन्वये पंचायतीच्या कामांना ग्रामसभेच्या मान्यतेने पंचायतीची प्रशासकीय मान्यता आवश्यक असल्याने तशी कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आली नाहीत.

3) पूर्ण कामांच्या ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर 8 मध्ये नोंदी घेतलेले उतारे नस्तीसोबत आढळून आले नाहीत.

4) मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे यांचेकडील प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील अट क्रमांक 7 अन्वये शासनाचे प्रचलित नियमानुसार शासकीय वजावटी केलेबाबताचे व शासकीय भरणा केलेबाबतचे पत्रव्यवहार नस्तीसोबत आढळून आले नाहीत.

**4.8 नागरी सुविधा विशेष अनुदान अंतर्गत 10 टक्के वसुली रकमेच्या विनियोगाबाबत.**

**पंचायत समिती सातारा, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 31) -** पंचायत समिती साताराचे सन 2015-2016 मधील कामांसाठी ग्रामपंचायतीकडून 10 टक्के हिस्सा वसूल करुन ठेव सदरी जमा केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर काम नागरी सुविधा विशेष अनुदानातील असून प्रशासकीय मान्यतेमधील अटीनुसार ग्रामपंचायतीने 10 टक्के स्वहिस्सा जमा करणे आवश्यक आहे. त्यानुसार 20 कामांवरील ग्रामपंचायतींनी रक्कम रुपये 11,90,000/- स्वहिस्सा म्हणून जमा केली असून ते ठेव सदरी जमा केले आहेत. तथापि, सदर कामाच्या बिलाचे संपुर्ण प्रदान 2515 नागरी सुविधा या लेखाशिर्षामधील प्राप्त अनुदानातून केले आहे. प्रशासकीय मान्यतेतील अट क्रमांक 13 अनुसार 90 टक्के रक्कम शासन अनुदान व 10 टक्के रक्कम ग्रामपंचायत स्वहिस्सामधून खर्च करावयाची असल्याने स्वहिस्सा रुपये 11,90,000/- ठेव सदरी जमा असलेल्या रकमेतून प्रदान करणे आवश्यक असतांना संपुर्ण रक्कम शासन अनुदानातून खर्च केल्याचे दिसून येते. यास्तव रुपये 11,90,000/- शासन सदरी जमा करणे आवश्यक आहे.

**4.9 विकास कामासाठी प्राप्त अनुदान आस्थापना विषयक बाबींवर खर्च केलेबाबत.**

**पंचायत समिती फलटण, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर बाबत रक्कम रुपये 5,43,332/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती फलटण यांना 2515 इतर ग्रामीण विकास कार्यक्रमासाठी प्राप्त अनुदानामधून आस्थापनाविषयक बाबींवर 30 प्रमाणकांन्वये रक्कम रूपये 5,43,332/- खर्च केला आहे. त्यात प्रामुख्याने संगणक व त्याचे साहित्य तसेच फर्निचर इत्यादी बाबींवर खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद सातारा यांचे सन 2014-2015 चे वार्षिक लेखे पाहता या सदरी संगणक संकेतांक 411 शिर्षक इतर ग्रामीण विकास कार्यक्रम 2515, 0753 जिल्हा परिषद पंचायत समिती निवासी प्रशासकीय इमारत बांधकाम अनुदान अंतिम तरतूद रक्कम रूपये 2,69,17,000/- खर्च रक्कम रूपये 2,54,34,676/- कमी खर्च रक्कम रूपये 14,82,324/- नमूद केला आहे.

**4.10 सभापती, उपसभापती व गटविकास अधिकारी यांचे दालनातील ऑफीस चेअर्स खरेदीतील अनियमितता.**

**पंचायत समिती तासगांव, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 08/02/2016 अन्वये रक्कम रुपये 99,478/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपकरातून घेण्यात यावयाच्या योजनामधील अनुसूचीतील संकीर्ण या सदरामध्ये सभापती, उपसभापती व गटविकास अधिकारी यांचे दालनातील ऑफिस चेअर खरेदी हि बाब नियमबाह्य ठरते.

2) उद्योग, उर्जा, कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक- भाखस 2014/प्र.क्र82/भाग iii/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 शासकीय विभागांनी कारवायाच्या कार्यालयातील खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची नियम पुस्तिकामधील परिशिष्ठ-17 नुसार लाकडी फर्निचर हि बाब कारागृहातून राखीव म्हणून ठेवण्यात आलेली असल्याने दरपत्रके मागवून केलेली खुर्च्या खरेदीही नियमबाह्य ठरते.

त्यामुळे वरील प्रकारे खरेदीतील झालेल्या नियमबाह्य खर्च रक्कम रुपये 99,478/- उपकर निधीतील वसुलपात्र ठरविण्यात येत आहे.

**4.11 साहित्य खरेदीतील गंभीर अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती जत, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती जत कडील टेबल ग्लास बसविणे कामी प्रमाणक क्रमांक 18 दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रूपये 49,725/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर खरेदीसाठी 2 कोटेशन प्राप्त आहेत. कोटेशन लिफाफाबंद नाहीत. लिफाफावर तारीख व वेळ नमूद नाही. प्राप्त 2 कोटेशन असताना तुलनात्मक दर कसे निश्चित केले ?

2) सदर प्राप्त कोटेशन पाहता श्री साई सेल्स, मिरज यांचे कोटेशनवर दिनांक 05/04/2016 व महादेव इंटरप्रायजेस, मिरज यांचे कोटेशनवर दिनांक 06/04/2016 म्हणजेच सन 2016-17 मधील कोटेशन मात्र खर्चाचे देयक सन 2015-2016 मधील आहे.

3) सदर टेबल ग्लास खरेदीची मंजूर टिपणी नाही. खर्चास मंजूरी घेतली नाही. तांत्रीक मंजूरी नाही. त्यामुळे सदर खरेदीची आवश्यकता कोणत्या विभागास आहे, हे समजून येत नाही.

4) सदर प्राप्त साहित्य साठा नोंदवहीत नोंद घेणे आवश्यक असताना नोंद घेतलेली नाही.

**4.12 रजा प्रवास सवलत खर्चाबाबत.**

**पंचायत समिती गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर बाबत 23 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 2,79,270/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती गडहिंग्लज सन 2015-2016 च्या लेखापरिक्षणात अधिकारी / कर्मचारी यांनी महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलतीचा लाभ घेतलेला आहे.

महाराष्ट् शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रप्रस/1114/प्र.क्रं.11/सेवा 5, दिनांक 10/06/2015 मधील टीप क्रमांक 6 अन्वये रजा प्रवास सवलत उपभोगल्यानंतर प्रवास खर्चाचे देयकासोबत रेल्वे / बसची तिकीटे सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच टीप क्रमांक 13 अन्वये रजा प्रवास सवलतीचा लाभ घेणाऱ्या व त्यांना सदर रक्कम मंजूर करणाऱ्या अनुक्रमे कर्मचारी / अधिकारी यांचेकडुन संगनमताने खोटी बीले सादर करुन मंजूर करुन घेतल्याचे आढळल्यास कडक शिक्षेस पात्र राहतील असे नमूद आहे.

रजा प्रवास सवलतीचा लाभ घेतलेल्या सर्व 23 अधिकारी / कर्मचारी यांच्या रजा प्रवास भत्ता देयकांची पडताळणी केली असता देयकासोबत रेल्वे / बसची तिकीटे जोडलेली नाहीत. त्यामुळे सदरच्या विधीबाहय रजा प्रवास सवलतीवर झालेला खर्च अंतिम अमान्य करण्यात येत आहे. संबंधिताकडुन रक्कम रुपये 2,89,830/- वसुल करुन शासन निधीत भरणा केलेचे दाखवावे.

**4.13 ग्रामविकास अधिकारी वेतन फरक देयकातील जादा अदाईबाबत.**

**पंचायत समिती पंढरपूर, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर बाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 31,34,939/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक डिएसआर-2008/प्र.क्र.8/आस्था-05, दिनांक 23/09/2008 अन्वये ग्रामसेवकांना 7 वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर 4500-125-7000 अशी सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, यांचे शासन आदेश क्रमांक डिएसआर 2009/प्र.क.61/आस्था- 05, दिनांक 20/05/2009 अन्वये 7 वर्षाच्या कालावधीनंतर रुपये 2,800/- ग्रेड पे मंजूर केला आहे. तथापि, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- डिएसआर-2013/प्र.क्र.3/आस्था-05, दिनांक 09/09/2014 अन्वये शासनाने सदरची तरतूद रद्द केलेली आहे. त्यामुळे ग्रामसेवकांना 7 वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर 4500-125-7000 मध्ये रुपये 2,800/- ग्रेड पे माहे सप्टेंबर, 2014 पर्यंतच देय आहे.

पंचायत समिती पंढरपूर यांनी उपरोक्त प्रमाणकान्वये माहे डिसेंबर, 2012 ते ऑगष्ट 2014 या कालावधीत ग्रामसेवकांना ग्रेड पे 2,800/- ऐवजी ग्रेड पे 2800+200 (विशेष वेतन) = 3,000/- ग्रेड पे मंजूर करुन फरक रक्कम अदा केली आहे. तथापि, सहाव्या वेतन आयोगामधील तरतुदीनुसार विशेष वेतनाची तरतुद रद्द झाली आहे. त्यामुळे ग्रेड पे रुपये 200/- संबंधितांना देय नाही. ग्रामविकास अधिकारी यांना जादा वेतन अदाई झाली आहे.

1) उत्तम दत्तात्रय भोसले 2) गंगाधर नारायण भोदरे 3) विष्णू रामचंद्र भुसे 4) सुदाम भानुदास वाकडे 5) सुर्यकांत पुंडलिक बिराजदार 6) अशोक पिराजे प्रक्षाळे 7) आत्माराम सुखदेव कोळी 8) जयकुमार आदिनाथ मोरे 9) भागवत के. पिसे 10) अरुण दि. मोरे 11) विष्णू के. गवळी 12) अरविंद सु. कुंभार 13) गोरख भ. नरसाळे 14) दत्तात्रय भा. भुजबळ 15) रमेश पा. कोळी

जादा ग्रेड पे रुपये 200/- मंजूर करुन अदा केलेल्या वेतनाची रक्कम रुपये 8,432x15 = 1,26,480/- लेखापरीक्षणांत अंतीम अमान्य करण्यात येत आहे. तरी 15 ग्रामविकास अधिका-याकडून रुपये 8,432/- प्रमाणे रक्कम रुपये 1,26,480/- वसुलात आणून शासन निधीत भरणा करावी.

**4.14 13 वा वित्त आयोग योजनेतुन करण्यांत आलेल्या बांधकामातील अनियमितता.**

**पंचायत समिती वरुड, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 27) -** पंचायत समिती येथील सन 2015-2016 या वित्तीय वर्षात सदर योजनेच्या अनुदानातुन सोबतच्या विवरणपत्र 6(अ) नुसार एकुण 15 कामे पूर्ण झाली असून सदर कामावर रुपये 28,00,395/- खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट 2009/प्र.क.114/जल 7, दिनांक 20/04/2011 नुसार कोणत्या प्रतीचे सिमेंट बांधकामासाठी वापरावयाचे याचे निकष नमुद केलेले आहे.

त्यानुसार बांधकामाकरीता पुढील दर्जा असणारे सिमेंट अत्यावश्यक आहे. (1) ओ.पी.पी सिमेंट IS 8112/1989 प्रमाणे स्प़ष्टीकरण केलेले 43 ग्रेड व 53 ग्रेड (2) आय एस 455/1989 व IS 8712/1989 व आयएस 8712/1989 प्रमाणे स्प़ष्टीकरण केलेला पोर्टलॅड टॅग सिमेंट वरील दर्जाचे सिमेंट ग्रामपंचायतीने वापरल्याचे अधिकृत दस्तऐवजा वरुन खरेदी केल्याचे आढळून आले नाही.

2) मोजमापे नोंदविते वेळी ग्रामपंचायतने वापर केलेल्या सिमेंटची खात्री संबंधीत तांत्रिक अभियंत्याने केल्याबाबत दप्तरी आवश्यक ते पुराव्या संबंधी दस्तऐवज लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाही. त्यामुळे योग्य गुणवत्तेचे काम करण्यात आल्याचे दिसून आले नाही. तसेच सदर कामावर वापरण्यात आलेल्या साहित्याची तपासणी प्रयोगशाळेतून करण्यात आल्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षणात उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/ 33, दिनांक 22/12/2000 या नुसार मोजमाप नोंदवहीच्या संदर्भात जिल्हा परीषदेच्या तांत्रिक अधिकाऱ्यांनी घ्यावयाची दक्षता याबाबत अनुक्रमांक 1 ते 17 सुचना केलेल्या आहेत. त्यातील सुचना क्रमांक 1,2,3,4,5,6,7,8, 9,12,15 इत्यादी सुचनांची अंमलबजावणी झाली नसल्याचे आढळून येते.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 166 (अ) (3) नुसार संबंधीत अभियंता यांनी मुल्यांकनाचे शेवटी सदर कामावर वापरलेल्या साहित्याचे गोषवारे नोंदविणे आवश्यक आहे. परंतु तशाप्रकारचे गोषवारे मोजमाप पुस्तकात नोंदविण्यात आलेले नसल्यामुळे कामावर वापरण्यात आलेल्या गौण खनिजाची वसुल करावयाची रक्कम दिसुन येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभागाची, अधिसूचना शासन राजपत्र क्रमांक गौखनि/10/1009/ प्र.क्रं.309/ख(3), खाणी व खनिजे (विनियमन व विकास) अधिनियम 1957 (1957 चा 67) याचे पोटकलम (1) आणि (3) व्दारा दिनांक 11/05/2015 नुसार सन 2015-2016 या कालावधीत रेती, खडी, मुरुम, गिटटी, इत्यादीवर खर्च करण्यापुर्वी 400/- प्रती ब्रास याप्रमाणे गौणखनिजाच्या सन 2015-2016 या कालाधीत करण्यांत आलेल्या कामाची मोजमापे नोंदविते वेळी गौणखनिजाच्या रक्कमांची गणना करुन गौण खनिजाची रक्कम संबंधीत ग्रामपंचायतीला प्रदान करण्यात येत असलेल्या देयकातून करुन गौण खनिजाच्या रकमा शासन खाती भरणा केल्या नाहीत. त्यामुळे शासनाची महसुलाची हानी झाल्याचे आढळून येते. रॉयल्टी पासेसची झेरॉक्स प्रत काढून इतर कामाचे देयकासोबत जोडण्यात आल्या आहेत. मुळ रॉयल्टी पासेस लेखापरीक्षणात आढळून आल्या नाहीत त्यामुळे सदर रायल्टी पासेस लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

6) सदर कामाची मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेले मोजमापे मान्य असल्याबाबत संबंधीत कंत्राटदाराची / सचिव / सरंपच यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. तसेच देयकावर सुध्दा स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

7) सदर रक्कम प्राप्त झाल्याबाबत ग्रामपंचायतकडुन नमुना 07 पावती लेखापरीक्षणात उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

**4.15 जनसुविधे अंतर्गत केलेल्या बांधकाम खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती मोर्शी, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती मोर्शी अंतर्गत सन 2015-2016 या वित्तीय वर्षात जनसुविधे अंतर्गत रक्कम रुपये 37,00,000/- एवढे अनुदान प्राप्त झाले असुन समितीने सन 2015-2016 या वित्तीय वर्षात ग्रामपंचायतीला जनसुविधे अंतर्गत रक्कम रुपये 35,28,585/- रक्कम जनसुविधे अंतर्गत करण्यात येणाऱ्या स्मशान भुमी बांधकाम, सौंदर्यीकरण व पोच रस्ता बांधकामासाठी वितरीत केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ददभू-2010/प्र.क्र.69/पंरा-6, मंत्रालय, मुंबई 400032, दिनांक 16/09/2010 नुसार जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीना जनसुविधांसाठी विशेष अनुदान देण्याबाबत शासनाने आदेशित करुन मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या. परिच्छेद क्रमांक 4 (1) नुसार सदर योजनेतंर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा समावेश गाव नियोजन आराखडयात असणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन सदर योजनेअंर्तगत ज्या गावाची निवड करुन निधी प्राप्त झाला, त्या गावाला वितरीत करण्यापुर्वी

नियमाला अनुसरुन गाव आराखडा, बांधकामास ग्रामसभेची मंजूरी असल्याबाबत प्रशासकीय मंजूरीचा ठराव व मंजूर कामाचे जागेचे महसुली पुरावे प्राप्त झाल्यानंतरच ग्रामपंचायतीस अनुदानाचे वितरण करणे गरजेचे होते. परंतु तशा प्रकारची कृती न करता अनुदान अग्रिम स्वरुपात ग्रामपंचायतीस वितरीत केल्याने शासन आदेशाचा भंग झाला आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेड्पीए 2000/प्र.क्र.44/33 मंत्रालय, मुंबई दिनांक 22/12/2000 मधील सुचना क्रमांक 1 ते 17 अन्वये सुचनांचे पालन करुन दिनांकीत मोजमापे नोंदविली नाहीत तथा सुचनांचे पालन केल्याचे आढळत नाही. त्याच प्रमाणे जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 चे नियम 166 ते 168 मधिल तरतूदीला अनुसरून मोजमापे न नोंदविल्यामुळे कामाचे स्थळ दर्शक ठिकाण नमुद नाही. कामाचे स्थळ दर्शविणारा नकाशा काढला नाही व प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापे नोंदवितेवेळी त्या कामाचे चित्र प्रथमता काढले नाही. त्यामुळे नोंदविलेले मोजमापे हे वस्तुस्थितीवर व प्रत्यक्ष कामाचे मोजमापाला अनुसरुन नोंदविल्याचे प्रमाणित करता येत नाही. साहित्याचे गोषवारे काढले नाहीत. वहन अंतराचे अनुसार मोजमापे नोंदविले नाहीत. त्यामुळे सन 2015-2016 या वित्तीय वर्षात नोंदविलेली मोजमापे योग्यरीत्या नोंदविल्याचे प्रमाणित करता येत नाही.

3) पुर्ण झालेल्या बांधकामाचे फोटो नस्तीत आढळुन आले नाही.

4) महाराष्ट्र शासन, राजपत्र महसुल व वन विभाग, शासन अधिसूचना क्रमांक गौखनि/10/1009/प्र.क्र.309 /ख(3), खाणी व खनिजे (विनियमन व विकास) अधिनियम,1957 (1957 चा 67) यांचे पोटकलम (1) आणी (3) व्दारा दिनांक 11/02/2010 नुसार सन 2015-2016 या कालावधीत रेती, खडी, मुरुम, गिट्टी, इत्यादीवर खर्च करण्यापुर्वी गौणखनिजाच्या सन 2015-2016 या कालावधीत मोजमापे नोंदविते वेळी रकमांची गणना करुन गौणखनिजाच्या रकमा कपात करणे आवश्यक असतांना गौणखनिजाच्या रकमा देयकातुन कपात करण्यात आल्या नाहीत.

5) विमा संचालनालय मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रविणी/2301/सहविमा/1 व शासन निर्णय क्रमांक जिप-2/ 2000/प्र.क्र.836/35, दिनांक 08/05/2002 नुसार अंदाजपत्रक किंमतीचे 1 टक्का विमा रक्कम ग्रामपंचायतीने कामगारांचा विमा न उतरविल्याने कामांच्या देयकातुन विम्याची 1 टक्का रक्कम कपात करणे आवश्यक होते, परंतु समितीने देयकांचे प्रदान करतांना 0.5 टक्के विमा कपात केली आहे. सबब कमी कपात केलेल्या विम्याची रक्कम परिगणीत करुन विमा संचालनालय खाती भरणा करावी.

**4.16 सी.सी.टि.व्ही. खरेदीबाबत.**

**पंचायत समिती अकोला, बार्शी टाकळी, अकोट, तेल्हारा, पातूर व मुर्तीजापूर, जिल्हा अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10,8,7,7,10,8) -** पंचायत समिती अकोला, बार्शी टाकळी, अकोट, तेल्हारा, पातूर व मुर्तीजापूर यांनी जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेतून रक्कम रुपये 22,88,535/- चे सी.सी.टी.व्ही. खरेदी केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा नियोजन समिती सदस्य, सचिव यांचे मुळ आदेश क्रमांक कक्ष 23/जिवा.यो-15-16/नाविन/ 1865/2015, दिनांक 23/12/2015 यांनी जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत नाविन्यपुर्ण योजनेतून जिल्हा परिषद करीता 62 यंत्र, सभागृहासाठी 06 व पंचायत समितीसाठी 70 सी.सी.टि.व्हि. कॅमेरेसाठी रुपये 29.00 लाख खरेदीस प्रशासकीय मंजुरी दिली व जिल्हा परिषदेला 29.00 लाखाचे अनुदान वितरण करण्यात आल्याचे आदेशित आहे. जिल्हा नियोजन समिती सदस्य सचिव यांचे शुध्दीपत्रकाचे आदेश क्रमांक कक्ष 23/जिवा.यो-15-16/नाविन/ शुध्दिपत्रक/1995/2016, दिनांक 25/01/2016 यांनी मुळ आदेशात जिल्हापरिषद, सभागृह वगळून फक्त पंचायत समिती स्तरावर सी.सी.यंत्रणा बसविणेबाबत उल्लेख करून शुध्दीपत्रक काढले. जिल्हा नियोजन समिती सदस्य सचिव यांचे मुळ आदेश क्रमांक कक्ष 23/जिवा.यो-15-16/नाविन/1865/2015, दिनांक 23/12/2015 नुसार सी.सी.टी.व्ही. यंत्रणा खरेदी करीता शासन निर्णय, उद्योग, उर्जा विभाग दिनांक 30/10/2015 नुसार ई-निविदा पध्दतीचा अवलंब करण्याच्या अटीच्या अधिन राहून प्रशासक्यि मंजुरी व अनुदान जिल्हा परिषदेला वितरण करण्यात आले. अनुदान वितरण जिल्हापरिषदेला असल्यामुळे त्यानुसार जिल्हयातील पंचायत समितीसाठी लागणाऱ्या वस्तुंसाठी जिल्हापरिषद

स्तरावर खरेदी प्रक्रीया राबवुन वस्तु खरेदी करुन पंचायत समितीला वस्तुचे वाटप करणे आवश्यक होते. परंतु ई-निविदा टाळण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अनुदान वितरण आदेश क्रमांक जिपअ/साप्रवि/सीबीसी/कावि-171/16, दिनांक 01/02/2016 नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रुपये 2,90,000/- प्रति पंचायत समितीला पंचायत समिती स्तरावर अनुदान वितरण करण्यात आले. अनुदान वितरण आदेशानुसार खरेदी दिनांक 15/02/2016 पर्यंत करणे आवश्यक होते मात्र सदर खरेदीबाबत जाहिरात न करता व ई-निविदा टाळून दरपत्रके मागवुन दिनांक 18/02/2016 ला खरेदीचे तुकडे पाडुन साहित्य खरेदी करण्यात आले.

2) बाजार दराची चौकशी न करता व पंचायत समितीने केलेली एकूण खरेदी उपरोक्त दोन्ही प्रमाणकानुसार 3.00 लाखापेक्षा जास्त होत असल्यामुळे पंचायत समितीने सुध्दा ईनिविदा पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करणे आवश्यक होते. मात्र पंचायत समितीने दर पत्रक मागावून खरेदी केली असल्यामुळे खरेदीचा शासन निर्णय क्रमांक भांखस:-2104/प्र.क्र.82/भागIII/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 नुसार खरेदीमध्ये पारदर्शकता, इष्टतम स्पर्धा, खरेदीचे विकेंद्रीकरण खरेदीच्या या मुळ तत्वाचे पालन झाले नाही.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामागार विभागाचा खरेदीचा शासन निर्णय क्रमांक भांखस:-2104/ प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 नुसार खरेदी करण्यापुर्वी मागणी कशी उद्भवली, खरेदीची आवश्यकता, उपलब्ध उत्पादनाची माहिती घेऊन बाजारभावाची चौकशी न करणे बाजारातील सदर वस्तुचे दर काय आहेत, तसेच कुठल्याही परिस्थितीत वस्तुचे दर किरकोळ विक्रिपेक्षा (एमआरपी) ज्यादा आहेत काय याची पडताळणी केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामागार विभागाचा खरेदीचा शासन निर्णय क्रमांक भांखस 2104/ प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 नुसार खरेदी समिती व तांत्रिक समिती स्थापन न केल्यामुळे खरेदीमध्ये पारदर्शकता व वस्तुच्या टिकाऊपणा बद्दल खात्री पटत नाही.

5) पंचायत समिती अकोट, प्रमाणक क्रमांक 868, दिनांक 15/03/2016 नुसार रुपये 1,20,000/- चे सी.सी.टी.व्हि. करिता सॉफ्ट सीएमएस, एलईडी मॉनीटर, लॅनकेबल खरेदी, युपीएस बॅटरी, कॅमेरा, इन्स्टॉलेशन इत्यादी करण्यात आले. वास्तविक सी.सी.टि.व्हि.साठी लागणाऱ्या वस्तु जिल्हा नियोजन समिती यांनी मुळ प्रशासकीय मंजुरी व अनुदान वितरणाच्या मर्यादितच खरेदी होणे आवश्यक होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक 181, दिनांक 01/02/2016 नुसार जिल्हा परिषदेने पुन्हा पंचायत समितीला सी.सी.टि.व्हि. खरेदी करीता रुपये 1,20,000/- दिले. पंचायत समितीने रुपये 1,20,000/- दराचे सी.सी.टि.व्हि. खरेदी केले याचाच अर्थ पहिल्या प्रमाणकानुसार केलेल्या सर्व वस्तुची खरेदी किरकोळ दराच्या किंमती पेक्षा जास्त दराने खरेदी केल्यामुळे अनुदान अपुरे पडल्यामुळेच पुन्हा अनुदान वितरण करण्यात आले. रुपये 1,20,000/- चे वितरण केलेल्या अनुदानाला जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव यांचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. यावरुन तरतुद नसतांना खरेदी केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) पंचायत समितीची सी.सी.टि.व्हि.यंत्रणा बसविण्याबाबतची टिपणीची तपासणी केली असता संबंधित अधिकारी / कर्मचारी टिपणीतील अभिप्राय मोघम स्वरुपात दिले जातात. शासनाच्या दिनांक 30/10/2015 च्या आदेशाने काय करणे अपेक्षित आहे किंवा काय करू नये याबाबत स्पष्ट अभिप्राय देण्यात येत नसल्यामुळे जबाबदारी टाळण्याचा प्रकार दिसतो.

7) सी.सी.टि.व्ही. खरेदी अनियमिततेबाबत पंचायत समिती अकोला परिच्छेद क्रमांक 10, पंचायत समिती बार्शी टाकळी परिच्छेद क्रमांक 8, पंचायत समिती अकोट परिच्छेद क्रमांक 7, पंचायत समिती तेल्हारा परिच्छेद क्रमांक 7, पंचायत समिती पातूर परिच्छेद क्रमांक 10, पंचायत समिती मुर्तीजापूर परिच्छेद क्रमांक 8 अन्वये आक्षेप नोंदविणेत आलेले आहेत. त्याची पुर्तता होणे आवश्यक आहे.

**4.17 नियमबाह्यरित्या विस्तार अधिकारी पदावर नियुक्ती करणेबाबत.**

**पंचायत समिती तेल्हारा, जिल्हा अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सन 2015-2016 मधील निवडक सेवापुस्तकाची तपासणी केली असता श्री**.**पी**.**पी**.**देशमुख यांची कनिष्ठ सांख्यीकी पदावर नियुक्ती झाली असून भुतलक्षी प्रभावाने विस्तार अधिकारी पदावर नियुक्ती केली याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री.पी.पी.देशमुख यांच्या सेवा पुस्तकाची तपासणी केली असता सेवा पुस्तकातील नोंदीनुसार श्री.पी.पी.देशमुख, कनिष्ठ सांख्यीकी पदावर नियुक्ती झाली आहे. जिल्हापरीषद मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन विभागाचे आदेश क्रमांक साप्रवि/स्था-2/1875/2006, दिनांक 07/06/2006 नुसार दिनांक 05/02/1980 नंतर ज्यांची वरिष्ठ सांख्याकी पदावर नियुक्ती झाली आहे. अशा जिल्हयातील वरिष्ठ सहाय्यक सांख्यीकी वर्ग-3 श्रेणी-3 या संवर्गातील नियुक्त्या हया पुर्वलक्षीप्रभावाने रुपांतरीत करुन वरिष्ठ सहाय्यक सांख्यीकी वर्ग-3 श्रेणी-3 नियुक्तीच्या दिनांक पासून विस्तार अधिकारी पदावर नियुक्त्या करण्यात आल्या. श्री.पी.पी.देशमुख यांची कनिष्ठ सांख्याकी पदावरची नियुक्ती असतांना त्यांना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभागाचे, शासन आदेश क्रमांक साप्रवि/स्था-2/1875/2006, दिनांक 07/06/2006 यांच्या आदेशात वरिष्ठ सहाय्यक सांख्यीकी दर्शवून विस्तार अधिकारी पदावर पुर्वलक्षी प्रभावाने केलेली नियुक्ती नियमबाहरित्या असून नियुक्तीच्या दिनांकपासून आता पर्यत विस्तार अधिकारी पदावर आहरीत झालेले वेतन वसुलीपात्र आहे.

**4.18 ग्रामपंचायत अपहार प्रकरणाबाबत.**

**पंचायत समिती पातूर, जिल्हा अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती पातूर अंतर्गत ग्रामपंचायत विभागातील ग्रामपंचायत स्तरावरील अपहार प्रकरणात सादर केलेल्या विवरणपत्रानुसार दिनांक 31/03/2016 अखेर एकूण 3 अपहार प्रकरणात कार्यवाही होणे प्रलंबीत आहेत. त्यामधे रूपये 1,77,441/- इतकी रक्कम गुंतलेली आहे, तरी सदर प्रलंबीत प्रकरणांचा निपटारा करून रक्कम वसूल / समायोजीत करणेबाबत.

1) पंचायत समिती पातूर येथील पंचायत विभागाकडून सादर केलेल्या माहितीनुसार पंचायत समिती अंतर्गत येणा-या ग्रामपंचायतीमधील अपहार प्रकरणात माहे मार्च 2016 अखेर एकूण 3 अपहार प्रकरणे प्रलंबीत असून त्यामध्ये रुपये 1,77,441/- एवढी रक्कम गुंतलेली आहे.

2) पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायत एकूण अपहार प्रकरणे,प्रकरणांचा संपूर्ण तपशिल तथा अपहार प्रकरणात गूंतलेली रक्कम तसेच करण्यात आलेली वसूली अपहार नोंदवहीत नमुद करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात अपहार नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने तशा प्रकारची कार्यवाही केल्याचे आढळत नाही.

3) ग्रामपंचायत स्तरावरील रक्कम संबंधीताकडून वसूल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक असतांना वसुलीबाबत काहीच कार्यवाही झाली नसल्याचे दिसून येत आहे. एवढया मोठया रक्कमेअभावी ग्रामपंचायती विकास कामांपासून वंचित राहत असून सदर बाब गंभीर स्वरूपाची असतांनाही यावर वेळीच कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

**4.19 17 सामुहिक विकास अंतर्गत 100 टक्के अनुदानावर ग्रामपंचायतींना लोखंडी ट्रि गार्ड पुरविणे खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती दिग्रस, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** उपरोक्त तपशिलाप्रमाणे सन 2015-2016 या वित्तीय वर्षात 17 सामुहिक जिल्हा परिषद सेस अंतर्गत 250 नग त्यावर एकुण रक्कम रुपये 5,00,000/- खर्च करण्यात आला. उपलब्ध नस्ती तथा अभिलेख्यांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2013 प्र.क्र.49/पं.रा-7, दिनांक 07/02/2013 अन्वये रुपये 1.00 लक्ष व त्यापेक्षा जादा किंमतीचे साहित्य खरेदी करीता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक असतांना तशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही. दरपत्रके मागवुन खरेदी करण्याचे प्रयोजन काय.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क.27/ 33, दिनांक 05/09/2000 अन्वये रुपये 50,000/- चे वरील खरेदीकरीता व्दी लिफाफा (दोन लखोटे) पध्दतीचा अवलंब करावयाचा असतांना तसे न केल्याने पुरवठादार अधिकृत असल्याचे स्पष्ट होत नाही.

3) दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द केलेली नाही.

4) लोखंडी ट्रीगार्डचे स्पेशिफिकेशन (वर्णन) मध्ये वजनाचा उल्लेख नाही. त्यामुळे ट्रीगार्ड कीती वजनाचे पुरवावयाचे होते याची नोदं कुठेही दिसुन येत नाही. साधारणता 15 किलो ग्रॅम वजनाचे ट्रीगार्ड प्रती किलो ग्रॅंम रुपये 80/- दराने रुपये 1,200/- चे होत असतांना पुरवठादारास रुपये 2,000/- प्रती नग या दराने रक्कमा प्रदान करण्यात आलेल्या असुन हेतु पुरस्पर वजनाचा उल्लेख वगळलेला आहे. एका लोखंडी ट्रीगार्ड वर 2,000/-(-)1,200/- = 800/- रुपये जादा प्रदान झाल्याचे लेखा परीक्षणाचे मत असुन 205 नग ट्रीगार्डचा 250 x 800 = 2,00,000/- जादा प्रदान झालेले आहे. सदर जादा प्रदानाबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चीत करुन रकमेची वसुली होणे आवश्यक आहे.

5) ज्या ग्रामपंचायतीना लोखंडी ट्रीगार्ड पुरविण्यात आलेत त्या ग्रामपंचायतीकडुन ट्रीगार्डचे मागणी पत्र नस्तीत दिसुन आले नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीना प्रत्यक्षात किती ट्रीगार्डची गरज आहे हे समुज शकले नाही. मागणी नसतांना लोखंडी ट्रीगार्ड पुरविण्याचे प्रयोजन काय खुलासा करावा.

6) ग्रामपंचायतीकडील साठा पुस्तिकेची तपासणी करीता सादर करणे बाबत अर्धसमासपत्र क्रमांक 5, दिनांक 22/07/2016 अन्वये मागणी करुनही ग्रामपंचायत सावंगा बु येथील साठा पुस्तक तपासणी करीता सादर करण्यात आले नाही. सदर ग्रामपंचायतीला 50 नग लोखंडी ट्रीगार्ड पुरविण्यात आलेले असुन ते ग्रामपंचायतीला प्राप्त झाले किंवा कसे कोणत्या जागेत कोठे ट्रिगार्ड लावण्यात आले याबाबत तपासणी करता आली नाही. त्यामुळे ट्रीगार्डचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) ग्रामपंचायत रोहणादेवी कळसा व सावंगा खुर्द (कुलवाडी) येथे अनुक्रमे 25+25+50=एकुण 100 नग ट्रिगार्ड प्राप्त झाल्याचे ग्रामपंचायत कडील साठा पुस्तकावरुन दिसुन येते. परंतु सदर ट्रीगार्ड कोणत्या वार्डात कोणत्या ठिकाणी कोणत्या वृक्षरोपांच्या संरक्षणार्थ लावण्यात आलेत याची साठा पुस्तकात नोंद नाही. मोघम स्वरुपात वापर विनियोग दर्शवुन साठा निरंक दर्शविला आहे, सदर बाब संशयास्पद आहे.

8) ग्रामपंचायत महागावं येथे 100 नग ट्री गार्ड पुरविण्यात आलेले असतांना ग्रामपंचायतकडील साठा पुस्तकात फक्त 5 ट्रीगार्ड प्राप्तीची नोंद दिसुन आली. उर्वरीत 95 ट्रीगार्ड कोठे पुरविण्यात आलेत. सरपंच ग्रामपंचायत महागांव यांनी 100 ट्रीगार्ड प्राप्त झाल्याबाबत पोच पावती दिलेली असुन ती नस्तीत उपलब्ध आहे. ट्रीगार्डचा पुरवठा सचिवा समक्ष न करण्यामागील कारणे नमुद करावीत. 95 नग ट्रीगार्ड कोठे वापरण्यात आलीत. त्याची नोंद साठा पुस्तकात का घेण्यात आली नाही. हया बाबी गंभीर स्वरुपाच्या असुन संशयास्पद आहेत.

**4.20 तीन चाकी घंटागाडी ग्रामपंचायतीना वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती नेर, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 6,60,750/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयकराची 2 टक्के रक्कम रुपये 13,215/- तसेच पुरवठाधारकांकडुन विक्रिकराची 2 टक्के रक्कम रुपये 13,215/- कपात केलेली नाही. त्यामुळे संबंधीताकडुन आयकर व विक्रिकराची रक्कम रुपये 26,430/- वसुल पात्र ठरते.

2) सदरचे साहित्ये खरेदी करण्यापुर्वी तांत्रिक मंजुरी घेवुन तीन चाकी घंटागाडीचे स्पेशिफीकेशन व दर निश्चित करणे आवश्यक होते. परंतु तशा प्रकारची मंजुरी न घेता नियमबाहयपणे साहित्ये खरेदी केले आहे. सबब खरेदी देयकामध्ये दाखविलेले दर स्पेशिफीकेशन प्रमाणे बरोबर आहे किंवा कसे खात्री करता आली नाही.

3) खरेदी केलेले साहित्येची नोंद मालमत्ता नोंदवहीवर घेवून ग्रामपंचायतीना वाटप करणे आवश्यक होते. परंतु तशा प्रकारची नोंद आढळून आली नाही.

4) सदर साहित्यांचे डिलीव्हरी मेमो लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

5) प्राप्त झालेल्या साहित्याची तपासणी शासकीय औदयोगिक संस्था, शासकीय तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रीकी महाविदयालयाकडून करुन सदर साहित्य स्पेशीफिकेशन प्रमाणे बरोबर असल्याबाबतचा तपासणी अहवाल घेणे आवश्यक असताना त्यानुसार तपासणी अहवाल प्राप्त न करता संबंधीत पुरवठाधारकास प्रदान केलेले आहे. साहित्याचे दर्जा तपासणीचे अहवाल उपलब्ध करून देण्यात आले नाही.

6) सदरचे साहित्ये खरेदी करण्यापुर्वी ग्रामपंचायतीची मागणी घेणे आवश्यक होते. सबब ग्रामपंचायत सभेमध्ये चर्चा करून सदर साहित्याची मागणी ग्रामपंचायतीने न केल्यामुळे अनावश्यक साहित्येची खरेदी केल्याचे आढळून येते.

7) सदरचे तीन चाकी घंटागाडी चालविण्याकरीता ग्रामपंचायतीकडे मजूर / मनुष्यबल उपलब्ध आहे किंवा कसे तसेच दर महिन्यात तीन चाकी घंटागाडी करीता लावलेल्या मजूराचे मानधनाची रक्कम शोधन करण्याकरीता ग्रामपंचायतीची आर्थिक स्थितीबरोबर आहे किंवा कसे या बाबीची खात्री न करता तीन चाकी घंटागाडी खरेदी करून ग्रामपंचायतीना दिले आहे.

8) ग्रामपंचायतीकडून तीन चाकी घंटागाडीचा वापर दररोज चालु असल्याबाबतचे अहवाल नसल्यामुळे आवश्यकते प्रमाणे साहित्ये खरेदी केल्याची खात्री होत नाही.

9) एकाच वर्षी एकाच वस्तुचे दोन वेगवेगळया दराने तीन चाकी घंटागाडी खरेदी केले आहे. सबब साहित्ये खरेदी करीता केलेली निविदा प्रक्रीया बरोबर असल्याचे प्रमाणित करता येत नाही.

10) सदर वस्तुचे खरेदीचे दर रुपये 24,250/- मंजूर असताना माहे मार्च मध्ये तीन चाकी घंटागाडी रक्कम रुपये 25 हजारने खरेदी केले आहे. सबब फरकाची रक्कम रुपये 6,000/- वसूल करुन निधीत जमा करुन अनुपालन दर्शवावे.

**4.21 17 - सामुहिक विकास अतंर्गत ग्रामपंचायतींना ट्री गार्डचा पुरवठा करणे.**

**पंचायत समिती घाटंजी, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 5,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमाक निविदा-2014/प्र.क्र.260/ पंरा-7, दिनाक 27/05/2015 अन्वये जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीनी त्यांच्या स्तरावरील रुपये एक लाख व त्यापेक्षा अधिक किंमतीचे साहित्ये खरेदीसाठी ई-निविदा प्रणालीचा अंवलब करणे बंधनकारक आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही करून साहित्ये खरेदी केल्याचे आढळून आले नाही.

2) केवळ ई-निविदा प्रणालीच्या प्रक्रियेतुन सूट मिळविण्याकरीता उपरोक्त प्रमाणे तुकडे पाडून साहित्य खरेदी केली आहे.

3) देयकातून आयकराची रक्कम कपात केलेली नाही. त्यामुळे आयकराची 2 टक्के रक्कम रुपये 10,000/- तसेच पुरवठाधारंकाकडुन विक्रिकराची 2 टक्के रक्कम रुपये 10,000/- कपात केलेली नाही. त्यामुळे संबंधीतांकडून आयकर व विक्रिकराची एकूण रक्कम रुपये 20,000/- वसुल पात्र ठरते.

4) पंचायत समितीस्तरचे निधीमधुन ठराविक ग्रामपंचायती करीता ट्रीगार्ड का खरेदी करण्यात आले. याबाबत खुलासा झाला नाही.

5) सदरचे साहित्ये खरेदी करण्यापुर्वी तांत्रिक मंजुरी घेवुन ट्रीगार्डचे स्पेशिफीकेशन व दर निश्चित करणे आवश्यक होते. परंतु तशाप्रकारची मंजुरी न घेता नियमबाहयपणे साहित्य खरेदी केले आहे. सबब खरेदी देयकामध्ये दाखविलेले दर स्पेशिफीकेशन प्रमाणे बरोबर आहे किंवा कसे खात्री करता आली नाही.

6) खरेदी केलेले साहित्याची नोंद मालमत्ता नोंदवहीवर घेवुन ग्रामपंचायतीना वाटप करणे आवश्यक होते. परंतु तशा प्रकारची नोंद आढळून आली नाही.

7) सदर साहित्याचे डिलेव्हरी मेमो लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

8) प्राप्त झालेल्या साहित्याची तपासणी शासकीय औदयोगीक संस्था, शासकीय तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रीकी महाविदयालयाकडून करुन सदर साहित्य स्पेशीफिकेशन प्रमाणे बरोबर असल्याबाबतचा तपासणी अहवाल

घेणे आवश्यक असताना त्यानुसार तपासणी अहवाल प्राप्त न करता संबंधीत पुरवठाधारकास प्रदान केलेल आहे. साहित्येचा दर्जा तपासणीचे अहवाल उपलब्ध करून देण्यात आले नाही. सबब योग्य दर्जाचे साहित्ये खरेदी केले किंवा कसे पडताळणी करता आली नाही.

9) सदरचे साहित्ये खरेदी करण्यापुर्वी ग्रामपंचायतीची मागणी घेणे आवश्यक होते. सबब ग्रामपंचायत सभेमध्ये चर्चा करून सदर साहित्येची मागणी ग्रामपंचायतीने न केल्यामुळे अनावश्यक साहित्याची खरेदी केल्याचे आढळून येते.

10) ग्रामपंचायती कडून उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

**4.22 बळीराजा चेतना अभियान अंतर्गत सन 2015-2016 या वित्तीय वर्षांत शेतकऱ्याना अनुदान वाटप करण्याकरिता ग्रामपंचायत स्तरावर दिलेल्या अनुदानाबाबत.**

**पंचायत समिती मारेगाव, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 56,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

बळीराजा चेतना अभियान सन 2015-2016 अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांचे आदेश क्रमांक यजिप/पंचा/लेखा/वशी/2315/15, दिनांक 28/10/2015 अन्वये शेतकरी आत्महत्या रोकण्यासाठी राबवयाच्या उपयोजनाकरीता वरीलप्रमाणे प्रति ग्रामपंचायत 1,00,000/- प्रमाणे अनुदान वाटप करण्यात आले. परंतु महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सएसीवाय-2015/प्र.क्र./119/म.7, दिनांक 25/08/2015 नुसार ग्रामपंचायत स्तरावर बळीराजा चेतना समिती स्थापन करुन आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत दिल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध करून दिले नाही.

**4.23 ठक्कर बापा आदीवासी वस्ती सुधार योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींना सौरपथदिवे पुरविणे खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती झरीजामणी, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती झरीजामणी ठक्करबापा आदीवासी वस्तीसुधार योजना निधीचे स्वतंत्र रोखपुस्तक ठेवण्यात आले असुन त्यातुन सन 2015-2016 या वर्षात 234 नग सौरपथदिवे प्रति नग रुपये 19,188/- दराने खरेदी केल्याबाबत उपरोक्त प्रमाणकान्वये एकूण रुपये 44,89,992/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर सौरपथदिवेची खरेदी दरकरारानुसार प्रति नग 19188 प्रमाणे करण्यात आलेले असुन महाराष्ट्र स्टेट को ऑप मार्केटिंग फेडरेशन मुंबई यांना पुरवठा आदेश क्रमांक 770, दिनांक 09/06/2015 अन्वये 234 नग सौरपथदिवे ग्रामपंचायत स्तरावर पुरविणे बाबत पुरवठा आदेश देण्यात आला असतांना लिबटी इंटरप्रायजेस अमरावती यांना जिल्हा मार्केटींग अधिकारी यवतमाळ यांनी पत्र क्रमांक 227, दिनांक 23/06/2015 अन्वये पुरवठा आदेश दिलेला असुन लिबटी इंटरप्रायजेस अमरावती यांनी सौरपथदिवेची उभारणी व देखभाल दुरुस्ती करुन देण्याबाबत रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा करून दिलेला आहे. पुरवठादाराने साहित्याचा पुरवठा केव्हा केला ज्याबाबत डिलीव्हरी मेमो सादर करण्यात आली नाही. त्यामुळे साहित्य ग्रामपंचाय स्तरावर केव्हा पोहचविले ते स्पष्ट होत नाही.

2) महाराष्ट्र शासनाने प्रधान सचिव तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी दरकरारासंबंधी पत्र क्रमांक 156, दिनांक 17/12/2014 मधील गट क्रमांक 6 नुसार सोलर प्रॉडक्टचा पुरवठा पश्चात नजिकच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातुन सौरपथदिव्याची गुणवत्ता तपासणीकरुन घेणेबाबत कळविले असतांना अशा प्रकारची तपासणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सोलर लाईट योग्य गुणवत्तेची असल्याचे स्पष्ट होत नाही.

3) गटविकास अधिकारी यांनी विस्तार अधिकारी कृषि यांना पत्र क्रमांक 2016, दिनांक 13/10/2015 अन्वये सुचना देवुन ग्रामपंचायतकडील सौरपथदिव्यांची तपासणी करणेबाबत कळविण्यात आलेले असतांना अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) ग्रामपंचायत मधील 18 गावाकरीता प्रत्येकी 13 नग याप्रमाणे 234 नग सौरपथदिवे खरेदी करण्यात आलेत. ग्रामपंचायत पना गावात सौरपथदिव्यांची आवश्यकता असल्याबाबतचे मागणी अर्ज लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही. मागणीशिवाय खरेदी करण्याचे प्रयोजन स्पष्ट होणे आवश्यक आहे.

5) अर्धसमास पत्र क्रमांक 8, दिनांक 06/09/2016 अन्वये ग्रामपंचायतकडील साठापुस्तक तपासणीकरीता मागविण्यात आले असतांना लेखापरीक्षण कालावधी पावतो साठापुस्तके सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर सौरपथदिवे प्राप्त झाले किंवा कसे, कोणत्या वार्डात कोणेकोणत्या ठिकाणी सौरपथदिवे लावण्यात आलेत याचा अर्थबोध होत नाही.

6) उपरोक्त 18 गावात सौरपथदिवे प्रत्येकी 13 नग बसविण्यात येवुन गाव प्रकाशमय झाल्याचे व सौरपथदिवे सुरु असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.

**4.24 13 वा वित्त आयोगा अंतर्गत ग्रामपंचातींना सोलार स्ट्रिट लाईट पुरविणे कामातील अनियमीतते बाबत. (राज्य शासन)**

**पंचायत समिती शेगांव, जिल्हा बुलढाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19 व 21) -** सदरबाबत एकूण रक्कम रुपये 62,85,988/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सौउदि -2010/प्र.क्र.14/पं.रा.-1, दिनांक 27/10/2010 नुसार महाराष्ट्र उर्जा विकास प्राधिकरणाच्या दरकरारावरील एजन्सीकडुन सौरदिवे खरेदी करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने याच कालावधीत महाऊर्जाचा (MEDA) चा दरकरार RC-2014-15/CR-9-ii/solar/635, दिनाक 13/02/2015 ते 31/03/2015 पर्यत अस्तित्वात होता व पुरवठा आदेश सुध्दा याच कालावधीत दिनांक 24/03/2015 या दिवशी देण्यात आला. पंचायत समिती शेगावं यानी दि. महाराष्ट्र सटेट को - ओपरेटिव्ह मार्केटीग फेडरेशन लिमिटेड याचेकडे नाममात्र सभासद म्हणुन नोंद असलेली कंपनी मे. क्रियेटीव्ह इलेकट्रीकल्स अहमदनगर याना एकूण 364 नग रक्कम रुपये 62,85,988/- चा पुरवठा आदेश दिला आहे. यामुळे वरील शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे. तसेच मेडाकडील दर करारानुसार याच स्पेशिफीकेशन सोलार लाईटचा दर पुर्ण करासह 17,641/- रुपये आहे. परंतु ज्या दरकारानुसार खरेदी करण्यात आली. त्यातील दर रुपये 19,188/- आहे. वरील दोन्ही बाबी पाहता प्रति नग रुपये 1,547/- जादा दराने व शासन आदेशाचे उल्लंघन करुन खरेदी केली आहे. त्यामुळे एकुण रक्कम रुपये 2,69,178/- + 2,93,930/- = 5,63,108/- रुपये नुकसान झाले आहे. याची वसुली होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2013/275/प्र.क्र.172/पं.रा.-7, दिनांक 19/10/2011 नुसार साहित्य खरेदी व सेवा पुरवठा शासनाव्दारे दरकरार केलेल्या वस्तू हया दरकरारानुसार त्या यंत्रणेकडुन खरेदी करण्यात याव्यात. परंतु तशी कार्यवाही करण्यात आली नाही. दि. महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटीव्ह मार्कीटीक फेडरेशन लिमिटेडचे सरव्यवस्थापक यांचे साध्या पत्राचे आधारे खरेदी करण्यात आली आहे. यांचे सोबत शासनाने कोणताही दरकरार केली नाही किंवा खरेदी करण्याबाबत कोणतेही शासन निर्णय नाही. यावरुन खरेदी केलेली साहित्य योग्य दर्जाचे व वाजवी दराचे असल्याबाबत खात्री होत नाही.

**4.25 रजा कालावधीत नियमित वेतन प्रदान केले असंताना रजा मंजुरी नंतर दुबार वेतन प्रदान करणेबाबत.**

**पंचायत समिती लोणार, जिल्हा बुलढाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 32) -** सदरबाबत रक्कम रुपये 93,048/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती लोणार येथील सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता लेखापरीक्षण तपासणीत सौ. एम.एस.वाघ ग्रामसेविका यांना प्रसुती रजा कालावधीचे नियमित वेतन देयकात माहे फेब्रुवारी 2015 ते जुन 2015 चे वेतन अदा करण्यात आले आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) यांचे रजा मंजुरी आदेश क्रमांक 332/16, दिनांक 23/03/2016 नुसार रजा मंजुर करण्यात येऊन रजा कालावधी दिनांक 13/01/2015 ते 11/07/2015 कालावधीचे वेतन प्रमाणक क्रमांक 98, दिनांक 23/05/2016 रुपये 18,83,165/- अन्वये रजा

कालावधीचे वेतन प्रदान केल्याचे आढळते. त्यामुळे वेतन रुपये 93,048/- चे दुबार प्रदान झाले आहे, यांची जबाबदारी निश्चित करून रक्कम वसुल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

**4.26 जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत ग्रामपंचायत चितापुर येथील स्मशानशेड, स्मशान भुमी पोच रस्ता व इतर सुविधा बांधकामातील अनियमितता.**

**पंचायत समिती कुही, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,80,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोजमाप पुस्तीकेतील मोजमापे व रक्कम हया अंतिम देयकासोबत जोडण्यात आलेल्या मोजमापाचे विवरणपत्र व रक्कमामध्ये तफावत असल्यामुळे जादा रक्कम प्रदान झाल्याचे नाकारता येत नाही. तरी जादा रकमेचे प्रदान झाले असल्यास रक्कम वसुल करण्यात यावे.

2) ग्रामपंचायतीला रक्कम मिळाल्याबाबत पोच स्वरुपात नमुना पावती 7 नस्तीत आढळुन आलेले नाही.

3) गौण खनिज रक्कम कपात न करणे - महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/1009/प्रक्र-309, दिनांक 11/02/2010 अन्वये कंत्राटदाराकडुन गौण खनिज रक्कम रुपये 32,207/- वसुल करण्यात यावे.

4) 1 टक्के विम्याची रक्कम कपातीबाबत - वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमांस-1098/प्र.क्र.29/98, दिनांक 20/06/1998 आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर/2000/प्र.क्र.837/पंरा.8(35), दिनांक 15/09/2003 अन्वये कामाचा विमा शासकीय विमा निधी मुंबई कडे काम सुरु होणेपुर्वी उतरविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. तरी संबधिताकडुन रुपये 7,800/- वसुल करुन विमानिधीचे शिर्षात जमा करण्यात यावे.

5) 2 टक्के आयकर कपातीबाबत - महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा/प्र.5, दिनांक 22/02/2008 व आयकर अधिनियम 1961 चे कलम 124 सी प्रमाणे कंत्राटदाराच्या देयकातुन 2 टक्के आयकर रुपये 15,600/- कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेले नाही.

6) 1 टक्के कामगार उपकर कपातीबाबत - महाराष्ट्र शासन, उदयोग व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.-108/कामगार-7-अ, दिनांक 17/06/2010 नुसार 1 टक्के कामगार उपकर रुपये 7,800/- कपात करणे आवश्यक असतांना कपात केलेले नाही.

**4.27 पंचायत राज संस्थांचे बळकटीकरण करण्याकरीता पंचायत समिती सदस्यांचा अभ्यास दौरा आयोजित करणे खर्चाबाबत.**

**पंचायत समिती पारशिवनी, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 34) -** पंचायत समिती पारशिवनीने सन 2015-2016 या वित्तीय वर्षात पंचायत समिती सेस निधी अंतर्गत पंचायत राज संस्थांचे बळकटीकरण करण्याकरीता पंचायत समिती सदस्यांचा अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत एकुण खर्च रुपये 1,24,080/- पंचायत समिती सेस निधी रोखपुस्तकामध्ये नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 मध्ये सदर शिर्षातर्गत मुळ अंदाजपत्रकीय तरतुद रुपये 50,000/- करण्यात आलेली असतांना उपरोक्त प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 23/04/2015 व 2, दिनांक 14/05/2015 अन्वये सदर बाबीकरीता माहे एप्रिल व मे, 2015 मध्ये खर्च केलेला आहे. पंचायत समिती सेस निधी सन 2015-2016 चे सुधारीत अंदाजपत्रकामध्ये सदर बाबीवर सुधारीत तरतुद रुपये 1,25,000/- दिनांक 10/02/2016 च्या पंचायत समिती विशेष सभा नुसार मंजुर केली असल्याने सदर बाबीवर मंजुर तरतुद रुपये 50,000/- असतांना तसेच सुधारीत तरतुद मंजुर करणेपुर्वीच रुपये 1,24,080/- मंजुर तरतुदीपेक्षा जादा रुपये 74,080/- नियमबाहय खर्च केल्याचे सिध्द होते.

2) प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 23/04/2015 रुपये 90,000/- श्री धर्मिजवार, विस्तार अधिकारी (सांखिकी) यांना सदर अभ्यास दौ-याकरीता देण्यात आलेल्या अग्रीम रुपये 90,000/- ची नोंद अग्रीम नोंदवही नमुना 79 मध्ये घेण्यात आलेली नाही.

3) सदर अभ्यास दौरा नस्तीमधील दिनांक 25/02/2015 रोजीच्या मासिक सभेतील ठराव क्रमांक 8 नुसार पंचायत समिती सदस्यांना राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परीषदांना भेटी देउन त्यांनी केलेल्या उल्लेखनिय कामाचा अभ्यास करण्याकरीता व त्याबाबतची जनजागृती आपल्या तालुक्यात करणे तसेच राज्यातील विविध कृषी विदयापीठे व कृषी संशोधन केंद्रांना भेट देउन नवनविन संशोधनाचा अभ्यास करुन सदरचा फायदा तालुक्यातील शेतक-यांना व्हावा या दृष्टीकोनातुन प्रयत्न करणे याकरीता असुन अभ्यास दौ-याचे संभाव्य वेळापत्रकानुसार तसेच प्रमाणकासह संलग्न देयकांवसुन पंचायत समिती सदस्य अभ्यास दौरा जिल्हा औरंगाबाद, शिर्डी, मालवण (सिंधुदुर्ग), वेंगुर्ला, कोल्हापुर व पुणे या ठिकाणी गेल्याचे दिसुन येते परंतु नियोजित वेळापत्रकानुसार संबंधीत ग्रामपंचायतींचे तसेच कृषी विदयापीठाचे सक्षम प्राधिका-यांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र अथवा संबंधीत अभिलेखे / दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

**4.28 पंचायत समितीकडून हातपंप व विदयुत पंप दुरुस्ती वर्गणीची जादा मागणी केल्याबाबत.**

**पंचायत समिती सेलू, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 16,17,500/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती सेलूने सन 2015-2016 मध्ये एकुण 10 विद्युत पंप व 492 हातपंप दुरुस्तीबाबत एकुण रक्कम रुपये 16,17,500/- पैकी रुपये 14,44,500/- वर्गणी ग्रामपंचायतीकडून वसूल केले याबाबत लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक आपना-3307/प्र.क्र.26/पापु-15, दिनांक 07/04/2008 नुसार हातपंप दर रुपये 1,000/- प्रतिवर्ष व विदयुपंप दर रुपये 5,000/- असा असतांना पंचायत समितीने हातपंप दर रुपये 2,500/- प्रतिवर्ष व विदयुत पंप रुपये 10,000/- प्रतिवर्ष प्रमाणे मागणी दर्शवून ग्रामपंचायतीला प्राप्त होणाऱ्या जमीन व महसुल व मुद्रांक शुल्क् अनुदानातून वर्गणीची जास्त रक्कमेची कपात केली आहे.

2) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-1002/प्र.क्र.639/पापु-07, दिनांक 22/05/2003 मधील परिच्छेद क्रमांक 3 नुसार वाढीव दराबाबत ग्रामपंचायतीने ग्रामसभेत निर्णय घेऊन जिल्हा परिषदेशी करार करणे आवश्यक असतांना तसा करार करण्यात आलेला नाही.

3) पंचायत समिती सेलू अंतर्गत असलेल्या ग्रामपंचायतीने अशा वाढीव दर मान्य असल्याबाबत कोणतेही करारनामा न करता वसुल केलेली रक्कम रुपये 14,44,500/- पैकी रुपये 7,88,000/- ग्रामपंचायतीला परत करण्यात यावे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 50 (1) नुसार मागणी, वसुली व शिल्ल्क रक्कमेबाबत नमुना-9 नोंदवही ठेवणे आवश्यक असताना पंचायत समितीने विहित नमुन्यात नमुना क्रमांक 9 मध्ये मागणी वसुली थकबाकी ठेवली नाही.

5) हातपंप व विदयुत पंप देखभाल व दुरुस्तीबाबत ग्रामपंचायतीकडून प्राप्त रक्कम रुपये 14,44,500/- चलानाव्दारे जिल्हा निधीत जमा केल्याची मुळ चलानाची प्रत मागणी करुनही लेखापरीक्षणास सादर केलेली नाही त्यामुळे रक्कम प्रत्यक्षात जमा केले किंवा नाही ही बाब तपासता आली नाही.

6) शासन निर्णयाचे उल्लंघन करुन वसुल करण्यात आलेल्या वर्गणीबाबत कारणमिमांसा होणे आवश्यक आहे.

**4.29 13 वा वित्त आयोग अंतर्गत पंचायत समिती स्तरावरील ग्रामपंचायतीने केलेल्या बांधकाम खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती कारंजा, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1)** - सदरबाबत रक्कम रुपये 92,63,980/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) B1 करारनामा क्लॉज 38(2) नुसार 125 टक्क्यापेक्षा जास्त परिमाणासाठी अथवा रुपये 5,000/- (जे जास्त असेल ते) पेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाच्या कामासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 114 व 118 नुसार सुधारीत तांत्रिक मंजूरी व अंदाजपत्रक तयार करण्यात आले नाही. उपरोक्त 4 बांधकामातील बाब क्रमांक 6 m 20 जादा परिमाण घेतल्याने रक्कम रुपये 71,731/- वसुल पात्र ठरते.

तसेच इतर 49 बांधकामातील मंजुर प्राकलनातील जादा परिमाण किंवा मंजुर प्राकलनातील बाबींवर बचत करुन बचतीची रक्कम नियमबाह्यरीत्या इतर बाबींवर खर्च केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) ग्रामपंचायत धावसा रस्ता दुरुस्ती कामावरील बाबींवर बचत करून इतर बाबींवर खर्च करणे - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 120 व 153(2) प्रमाणे मंजुर प्राकलनातील बाब क्रमांक 1,2,3,4,5 वर बचत करून बचतीची रक्कम नियमबाह्यरीत्या इतर बाबींवर खर्च केलेली आहे.

3) सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक जीआर34/सा-4/5999, दिनांक 08/01/2007 नुसार साहित्याचा कामावर वापरण्यापुर्वी त्याची प्रयोग शाळेकडून गुणवत्ता तपासुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारची कार्यवाही न करताच साहित्याचा वापर केलेला आहे.

4) रॉयल्टीची रक्कम रुपये 3,36,561/- देयकातून कपात केलेली आहे. तथापि रॉयल्टीची रक्कम योग्य शिर्षकाखाली योग्य खाती भरणा केल्याची पोचपावती लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही. तसेच सुरक्षा ठेव नोंदवही लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही.

5) ग्रामपंचायत कंत्राटदार म्हणून काम करण्याचा मुळ उद्देश ग्रामपंचायतीचे उत्पन्नात वाढ होणे - परिपत्रक क्रमांक जिपव/बांध/155/2013, दिनांक 01/04/2013, अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम 1968 चे परिशिष्ट 'आठ' अन्वये जिल्हा परिषदेची विकास कामे ग्रामपंचायतीस कंत्राटदारीने कार्यान्वित करण्यासाठी विना निविदा देण्याची तरतुद आहे. ग्रामपंचायतीचे उत्पन्नात वाढ व्हावी हा यामधील मुळ उद्देश आहे. असे असताना ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ झाल्याबाबत संबंधीत तांत्रिक अधिकारी तपासणी अहवाल नाही.

6) उपप्रमाणकाची मागणी न करताच ग्रामपंचायतीला प्रदान केलेला आहे. तसेच कोणकोणत्या कपाती केल्याबाबत संबंधीत तांत्रिक अधिकारी यांनी तपासणी केलेली नाही.

7) मोजमाप नोंदवहीत (M.B.), सिमेंट, रेती, मुरूम, 80 mm कंझमशन गोषवारा काढलेला नाही.

8) प्राक्कल्नातील T.S. No. निर्गमित केल्याचा दिनांक नाही व कोणत्या मंजुरी आदेशीत केल्याचा तपशिल नाही. तसेच प्राकलनात कामाचा लोकेशन नमुद नाही.

9) नियमानुसार आयकर विक्रीकर, 1 टक्का विमा व 1 टक्का उपकर देयकातुन कपात केलेला नाही.

**4.30 कार्यालयीन किरकोळ खर्चातील अनियमितता बाबत.**

**पंचायत समिती आष्टी, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,63,415/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रमाणकाचे लेखापरीक्षण केले असता रक्कमा किरकोळ खर्च लेखाशिर्षा अंतर्गत खर्च करण्यात आले. वरील देयकातील तपशिलानुसार खरेदी करण्यात आलेले प्लायवुड, विदयुतीकरण काम व कार्यालयीन इमारत सिलींग तोडणे कामाकरीता वरील खर्च करण्यात आलेले आहे. सदर तपशिला अन्वये वरील खर्च हा कार्यालयीन इमारत दुरुस्तीकरीता खर्च करण्यात आलेला असताना पंचायत समिती आष्टीने रोखपुस्तकात कार्यालयीन खर्चाची नोंद करुन कार्यालयीन किरकोळ खर्चाअंतर्गत देयके प्रदान करण्यात आले.

महाराष्ट्र जिल्हापरीषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 100 व 101 अन्वये वरील कामाची प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक असताना सदर मंजुरी न घेता नियमबाहय खर्च करण्यात आले.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 163 नुसार पंचायत समिती आष्टीने कार्यालय दुरुस्तीच्या कामाची नोंद नमुना 52 मोजमाप मुल्यांकन पुस्तकात करणे आवश्यक असताना सदर कामाचे मुल्यांकन व प्राकलन तयार करण्यात आलेले नाही.

3) प्रमाणक क्रमांक 1172 अन्वेय श्री. वाय. डि. दरणे यांना कार्यालयीन किरकोळ कामांकरीता रुपये 25,000/- अग्रिम प्रदान करण्यात आले. सदर अग्रिम कोणत्या प्रयोजनाकरीता देण्यात आले याचा तपशिल व अग्रिम आदेश देयकासोबत जोडलेले नाही. महाराष्ट्र जिल्हापरीषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 210 ब नुसार तात्पुरते अत्यंत निकडीचे असल्यास व अग्रिमाची रक्कम रुपये 500/- पेक्षा जास्त असल्यास पंचायत समितीची मंजुरी घेणे आवश्यक असताना सदर कार्यवाही केलेली नाही. सदर अग्रीमाचे समायोजन करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 अन्वेय रुपये 5,000/- वरील किंमतीचे साहित्याचे दरपत्रक मागवुन खरेदी करणे आवश्यक आहे. वरील प्रमाणकानुसार खरेदी करण्यात आलेले साहित्य दरपत्रकाशिवाय खरेदी करण्यात आल्याने पंचायत समितीस स्पर्धात्मक दराचा फायदा झालेला नाही.

**4.31 13 व्या वित्त आयोग पंचायत समिती स्तरावर घेण्यात आलेल्या कामाबाबत.**

**पंचायत समिती तुमसर, जिल्हा भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,10,686 /- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2010/प्र.क्र.22, दिनांक 30/08/2010 अन्वये पंचायत समिती स्तरावर हाती घ्यावयाच्या कामाबाबत सविस्तर नमुद केले आहे. या कामा व्यतिरिक्त घेण्यात आलेले कामे हे नियमबाहय असुन झालेल्या खर्चाबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन सदर खर्च हा वसुलपात्र ठरविण्यात यावा असे नमुद आहे. परंतु पंचायत समिती तुमसर तर्फे नमुद शासन निर्णयाकडे दुर्लक्ष करुन शासन निर्णयाप्रमाणे कामे न घेता संगणक व लॅपटॉप खरेदी, स्टिल अलमारी खरेदी, बायोमॅटीक मशिन खरेदी, प्रिंटर व कार्टिज खरेदी, एलएडी लाईट ख्ररेदी, सभापती कक्षा करीता महाराजा सोफा खरेदीची कामे हाती घेण्यात आलेली आहे. त्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन झालेल्या खर्च वसुल करण्यात यावा.

2) 13 व्या वित्त आयोगातुन एलएडी लाईट खरेदी करताना नॅशनल इलेक्टिकेशन वर्क्स नागपुर जगजीवन कोऑपरेशन नागपुर, बानेर इंटरप्रायजेस नागपुर यांचे कडुन दरपत्रक मागविण्यात आलेले होते. परंतु संबंधीत पुरवठादाराचे विक्रिकर नोंदणी प्रमाणपत्र, आयकर प्रमाणपत्र इत्यादी मागविण्यात आले नाही. एलएडी लाईट खरेदी करताना शासन दर करार आहे किंवा कसे याबाबत खात्री न करता खरेदी करण्यात आलेले आहे. पुरवठा करण्यात आलेले एलएडी लाईटचे डिलीव्हरी मेमो उपलब्ध नाही. त्यामुळे पुरवठा कधी झाला याबाबत खात्री करता आली नाही. पुरवठादारा सोबत एलएडी लाईटच्या देखभाल व दुरुस्ती करीता ठराविक कालावधीचा करारनामा करणे आवश्यक होते. परंतु तसा करारनामा करण्यात आलेला नाही. एलएडी लाईटचे तांत्रिक तपासणी शासकीय प्रयोगशाळेमधुन करण्यात आले नाही त्यामुळे त्याचा गुणवत्तेबाबत खात्री करता आलेले नाही.

3) 13 वा वित्त आयोगामधुन कार्यालयीन कामाकरीता 1 लॅपटॉप व 2 संगणक खरेदी करण्यात आलेले आहे. याकरीता तेजस इन्फोटेक, वाडी, सहारा कॉम्प्युटर सिस्टीम नागपुर, एससीएस कॉम्प्युटर सोल्युशन तुमसर यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आलेले आहे. व तेजस इन्फोटेक, वाडी यांचे दर स्विकृत करण्यात आलेले आहे. परंतु तेजस इन्फोटेक, यांनी पुरवठा केलेल्या दरामध्ये तसेच तुलनात्मक तक्त्यामध्ये खाडाखोड केल्याचे दिसुन येते. संबंधीत पुरवठादाराचे विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र, आयकर प्रमाणपत्र इत्यादी मागविण्यात आले नाही. खरेदी करताना शासन दर करार आहे किंवा कसे याबाबत खात्री न करता खरेदी करण्यात आलेले आहे. पुरवठा करण्यात आलेले संगणकाचे व लॅपटॉपचे डिलीव्हरी मेमो उपलब्ध नाही. त्यामुळे पुरवठा कधी झाला याबाबत खात्री करता आली नाही. पुरवठादारासोबत संगणक व लॅपटॉप देखभाल व दुरुस्ती करीता ठराविक कालावधीचा करारनामा करणे आवश्यक होते. परंतु करारनामा करण्यात आलेला नाही. संगणक व लॅपटॉप यांचे तांत्रिक तपासणी शासकीय प्रयोगशाळेमधून करण्यात आले नाही त्यामुळे त्यांच्या गुणवत्तेबाबत खात्री करता आलेली नाही. योजना राबविताना प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेले नाही.

4) 13 वा वित्त आयोगातुन सभापती कक्षेकरीता 2 नग 3 सिटर महाराजा सोफासेट खरेदी करण्यात आले. टिकेश फर्निचर लाखनी, सागर फर्निचर लाखनी, गोल्डी सोफा अँड कुशन वर्क्स लाखनी यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आलेले होते. सोफा सेटच्या खरेदीबाबत स्थानिक बाजारपेठ तुमसर मधुन दरपत्रक न मागविता 100 कि.मी. अंतरावरील लाखनी मधुन दरपत्रक मागविण्यात आलेले आहे. टिकेश फर्निचर लाखनी व सागर फर्निचर लाखनी यांचे दरपत्रक एकाच प्रकारचे दिसून येते. दरपत्रकावर रजिस्ट्रेशन नंबर नमुद नाही. संबंधीत पुरवठादाराचे विक्रिकर नोंदणी प्रमाणपत्र, आयकर प्रमाणपत्र इत्यादी मागविण्यात आले नाही. खरेदी करताना शासन दर करार आहे किंवा कसे याबाबत खात्री न करता खरेदी करण्यात आलेले आहे. पुरवठा करण्यात आलेले फर्निचरचे डिलीव्हरी मेमो उपलब्ध नाही त्यामुळे पुरवठा कधी झाला याबाबत खात्री करता आली नाही. योजना राबविताना प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली नाही.

5) 13 वा वित्त आयोगातुन बायोमेट्रिक मशिन रुपये 14,990/- जय बजरंग बहुउददेशीय बेरोजगार सहकारी संस्था मर्यादित भंडारा यांच्याकडून दरपत्रकाची कार्यवाही न करता नियमबाहयरीत्या खरेदी करण्यात आलेले आहे.

6) 13 वा वित्त आयोगातुन प्रिंटर खरेदी करताना जय बजरंग बहुउददेशीय बेरोजगार सहकारी संस्था मर्यादित भंडारा, आर्या कॉम्प्युटर भंडारा, ओम कॉम्प्युटर भंडारा यांच्याकडून दरपत्रक मागविण्यात आलेले आहेत. संबंधीत पुरवठादाराचे विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र, आयकर प्रमाणपत्र इत्यादी मागविण्यात आले नाही. खरेदी करताना शासन दर करार आहे किंवा कसे याबाबत खात्री न करता खरेदी करण्यात आलेले आहे. पुरवठा करण्यात आलेले प्रिंटरचे डिलीव्हरी मेमो उपलब्ध नाही त्यामुळे पुरवठा कधी झाला याबाबत खात्री करता आली नाही. पुरवठादारासोबत प्रिंटर देखभाल व दुरुस्ती करीता ठराविक कालावधीचा करारनामा करणे आवश्यक होते. परंतु करारनामा करण्यात आलेला नाही. प्रिंटरची तांत्रिक तपासणी शासकीय प्रयोगशाळेमधून करण्यात आली नाही. त्यामुळे त्याचा गुणवत्तेबाबत खात्री करता आलेले नाही. योजना राबविताना प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली नाही.

**4.32 वृध्द कलाकार मानधन.**

**पंचायत समिती लाखांदुर, जिल्हा भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सन 2015-2016 मध्ये जुन्या 23 व नवीन 15 वृध्द कलाकारांना मानधनाचे प्रदान करण्यांत आले. मागील वित्तीय वर्षात जुन्या 28 वृध्द कलाकारांपैकी 5 वृध्द कलाकारांचे निधन झाल्यामुळे रुपये 25,000/- अखर्चित असल्याचे आढळुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त निधन पावलेल्या वृध्द कलाकारांची अखर्चित रक्कम रुपये 25,000/- शासनास परत करणे आवश्यक आहे.

2) नियमानुसार वृध्द कलाकारांचे मानधन संबंधीतांच्या बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे. मात्र पंचायत समितीने सर्व वृध्द कलाकारांना मानधनाच्या रक्कमा धनादेशामार्फत दिल्या आहेत.

3) 23 वृध्द कलाकारांपैकी 9 वृध्द कलाकारांच्या हयातीचे दाखले लेखापरिक्षणास सादर करण्यात आले नाही.

**4.33 जनसुविधा योजने अंतर्गत केलेल्या कामांबाबत.**

**पंचायत समिती कन्नड, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रुपये 31,80,530/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती कन्नड सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे तपशिलात दर्शविलेप्रमाणे जनसुविधा या लेखाशिर्षांतर्गत खर्च नोंदविण्यात आलेला आहे.

1) महाराष्ट्र शासन, विक्रीकर विभाग, शासन अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराचे देयकातून 5 टक्के मुल्यवर्धित कराची रक्कम कपात करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त तपशिलात दर्शविलेल्या कामांचे बाबतीत मुल्यवर्धित कराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. तरी 5 टक्के प्रमाणे मुल्यवर्धीत कराची रक्कम संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करावी.

2) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) अन्वये 2 टक्के दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात आयकर रकमेची कपात करण्यात आलेली नाही. तरी आता 2टक्के प्रमाणे आयकर रक्कम संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुंसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सिमेंट/साहित्य-1099/प्र.क्र.56, दिनांक 30/06/2000 नुसार कामावर वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेतून गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करुन अंतिम देयकासोबत सादर करणे आवश्यक असताना तसे चाचणी अहवाल जोडलेले नसताना देयके पारीत करण्यात आलेली आहेत.

4) सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 (13 व 15) नुसार मोजमाप नोंदी रक्कम प्रदानाच्या वेळेस लालशाईने क्रॉस करणे आवश्यक असताना तशा पध्दतीने कर्णरेषा काढलेली नाही. त्यामुळे एकाच देयकाची दुबार अदाई झालेबाबतची शक्यता नाकारता येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 अन्वये प्रत्यक्ष कामाचे जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात अशा पध्दतीने माहिती दर्शविणारे फलक बसविलेले नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1050/प्र.क्र.1113/33, दिनांक 25/10/1990 नुसार ग्रामपंचायत काम करण्यास आर्थिकदृष्टया व तांत्रिकदृष्टया सक्षम असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता ग्रामपंचायतीस कामे देण्यात आलेली आहेत. याबाबत खुलासा करावा. तसेच संबंधीत ग्रामपंचायत आर्थिक / तांत्रिकदृष्टया सक्षम असल्याबाबत गटविकास अधिकारी / उपअभियंता यांचे प्रमाणपत्र दर्शवून खात्री पटवावी.

7) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास/109/प्र.क्र.2/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 नुसार कंत्राटादाराने शासकीय कामाचा विमा उतरवून त्याबाबतचा पुरावा बांधकाम विभागास सादर करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. म्हणून विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र दिनांक 02/06/2003 नुसार देयकातून 1 टक्के विमा रक्कम कपात करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम रुपये 31,805/- संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करावी.

## 4.34 अतिरिक्त डिझेल वापराबाबत.

**पंचायत समिती अंबाजोगाई, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत 8 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,71,955/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबाजोगाई यांनी सन 2015-2016 मध्ये वाहन क्रमांक एम.एच.23 ए एफ-0036 वापरले आहे. सदर वाहनाचे लॉगबुक तपासले असता सन 2015-2016 मध्ये 4793.47 लिटर इतका डिझल वापर झालेला आहे. शासन निर्णय क्रमांक जेईपी/10/प्र.क्र./2000/05, दिनांक 20/12/2000 नुसार गटविकास अधिकारी यांना डिझेल मर्यादा वार्षिक 3,000 लिटर इतकी आहे. अतिरिक्त डिझेल 1793.47 लिटर इतका वापर केला आहे. अतिरिक्त डिझेल 1793.47 * सरासरी दर प्रती लिटर रुपये 57/- प्रमाणे रक्कम रुपये 1,02,228/- वसूलपात्र ठरते.

2) सदर वाहनाच्या दैनिक वापरावर काही ठिकाणी विस्तार अधिकारी यांच्या देखील स्वाक्षऱ्या आहेत. यावरुन सदर वाहनाचा वापर गटविकास अधिकारी त्यांच्या अधिनस्त कर्मचा-यांनी देखील केल्याचा दिसतो.

## 4.35 ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन वाटपाबाबत.

**पंचायत समिती केज, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषद बीड सन 2015-2016 या कालावधीकरीता जिल्हा परिषद अंतर्गत पंचायत समिती केज कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतींना वेतन

अनुदान वाटपापोटी 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 9,61,775/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2012/प्र.क्र.235/पंरा-3, दिनांक 04/03/2014 नुसार ग्रामपंचायत कर्मचा-यांना किमान वेतन वाटप करण्यापुर्वी ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न विचारत घेवुन मानधन वितरीत करावयाचे आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार रुपये 2.00 लक्षापर्यंत उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना 100 टक्के शासन हिस्सा अनुज्ञेय आहे. रुपये 2.00 लक्ष ते 5.00 लक्षपर्यंत उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना 75 टक्के शासन हिस्सा अनुज्ञेय आहे. व उर्वरित सर्व ग्रामपंचायतींना 50 टक्के प्रमाणे शासन हिस्सा अनुज्ञेय आहे. संबंधीत पंचायत समितीने उपलब्ध करुन दिलेल्या 2013-2014 च्या उत्पन्नाच्या यादीनुसार (उत्पन्नाची यादी विवरणपत्रात जोडलेली आहे.) पडताळणी केली असता वेतन जादा अदा केलेले आहे.

सदरबाब उदाहरणादाखल असुन या पुर्वी दिलेल्या तसेच इतर ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाची गणना करुन योग्य अनुदान निर्धारण करुन घेवुन संबंधित शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. उपरोक्त प्रमाणे जादा प्रदान झालेली रक्कम रुपये 97,575/- लेखापरिक्षणात अंतिम अमान्य करण्यात येते. जादा अदाईची रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.सी.एम2699/ प्र.क्र.206(1) 21, दिनांक 21/01/2000 चे परिच्छेद क्रमांक 4 मधील तरतुदीनुसार ग्रामपंचातीनी प्रथम आपल्या कर्मचा-यांना किमान वेतनाचे प्रदान केल्यानंतर शासन हिस्याची रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचेकडून प्रतिपुर्ती करावयाची आहे. परंतू जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीकडुन त्यांच्या कर्मचा-याना किमान वेतनाचे प्रदान केल्याबाबतचे प्रमाणपत्र क्रमांक, दिनांक व रक्कम इत्यादी माहिती प्राप्त न करता अनुदानाचे वाटप केले आहे.

3) तसेच ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन अनुदान ग्रामपंचायतीस प्राप्त झाल्याबाबत त्या-त्या ग्रामपंचायतीची सामान्य पावती जिल्हा परिषदेने घेतलेली नसल्याचे दिसुन येते.

**4.36 ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी यांना रोख भत्ता (विशेष वेतन) प्रदान केल्यामुळे झालेल्या ज्यादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती पालम, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती पालमच्या सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात निवड महिन्यातील उपरोक्त प्रमाणकाव्दारे पंचायत समितीने ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक यांना महाराष्ट्र शासन, वित्त विभागाच्या दिनांक 23/12/1998 च्या दिनांकित शासन निर्णयान्वये रोख रक्कम हाताळणे बाबत प्रमाणक क्र.44, दिनांक 18/12/2015, रुपये 6,48,901/- वेतन माहे डिसेबर-2015, प्रमाणक क्रमांक 201, दिनांक 31/03/2016, रुपये 6,13,539/- वेतन माहे फेब्रुवारी 2016 एकूण रुपये 12,62,440/- अन्वये रोख भत्ता (विशेष वेतन) प्रदान केलेला आहे.

तथापि, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेपूर-1209/प्र.क्र.20/सेवा-9, दिनांक 27/02/2009 मधील प्रपत्रातील अ.क्र. 29 परिच्छेद क्र.3.25.2 अन्वये सर्व संवर्ग पदात मिळणारे विशेष वेतन बंद करण्यात यावे असे स्पष्ट निर्देश असतांना पंचायत समितीने खालील ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक यांना प्रतीमहा रुपये 75/- रोख भत्ता (विशेष वेतन) माहे मार्च 2016 पर्यंत प्रदान केलेला आहे. त्यामुळे सन 2015-16 मध्ये रुक्कम 23,400/- चे जादा प्रदान झालेले आहे. तसेच जानेवारी 2006 ते मार्च 2015 या कालावधीत जर त्यांना रोखभत्ता प्रतिमहा रुपये 75/- प्रदान केलेला असेल तर त्या रक्कमेचा ताळमेळ घालून येणारी रक्कम (+) सन 2015-16 मधील जादा प्रदान रुपये 23,400/- संबधीताकडून वसूल करून शासन खाती भरणा करावी.

**4.37 ग्रामपंचायतीच्या अफरातफर प्रकरणाबाबत.**

**पंचायत समिती सेनगाव, जिल्हा हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 27) -** सदरबाबत रक्कम रुपये 24,94,082/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

8 प्रकरणांची एकुण रक्कम रुपये 20,94,082/- वसुल होणे बाकी आहे. तरी याबाबत प्रभावीपणे अमंलबजावणी करुन थकबाकी वसुल करुन पुर्तता दर्शवावी. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 36 नुसार अफरातफर बाबतची माहिती स्थानिक निधी लेखा विभागाला देणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही. तरी अफरातफर प्रकरणाची माहिती देण्यात यावी व नोंदवही अदयावत करुन पुर्तता दर्शवावी.

**4.38 ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन शासन निकषाचे पालन न करणे व ग्रामपंचायत सरपंच व सदस्य भत्ता वाटपातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** पंचायत समिती किनवट सन 2015-16 चे लेखा परिक्षणात ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन व सरंपच मानधन व सदस्य भत्ता यावर रक्कम रुपये 27,57,250/- खर्च नोंदविला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एस.2012/प्र.क्र.235/परा, दिनांक 04/03/2014 नुसार ग्रामपंचायत कर्मचारी यांना शासनाकडुन किमान वेतन अनुदान मिळविण्यासाठी 100 टक्के व 75 टक्के वाढीव हिश्सास पात्र होण्यासाठी सबंधीत ग्रामपंचायतीने नियमाप्रमाणे कराची फेर आकारणी व गत वर्षात सर्व कराच्या एकूण 90 टक्के वसूली बंधन कारक राहिल. व सन 2015-16 गत वर्षाची म्हणजेच 2014-15 ची एकूण वसुली 80 टक्के नसतांना सरसकट ग्रामपंचायतीना 100 टक्के शासन अनुदान प्रदान केले आहे. त्यामुळे शासन निधीचे नुकसान झाले आहे. याबाबत 0 ते 5,000 पर्यंत लोकसंख्या असलेल्या 0 ते 20,000 उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतीचे अनुदानास पात्र असल्याचे सन 2014-15 ची एकूण वसुली 80 टक्के झाल्याचे अभिलेखे दर्शवून खात्री पटवावी अन्यथा शासन निधी जवाबदाराकडून वसुली करणे आवश्यक आहे.

2) उपरोक्त प्रमाणकाची तपासणी केली असता सुधारीत आकृतीबध्द नुसार कर्मचाऱ्यांना किमान वेतनाची रक्कम देय खात्यावर जमा करणे आवश्यक आहे. परंतु ग्रामपंचायत खात्यावर जमा केले आहे.

3) पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायत कर्मचारी माहिती ग्रामपंचायत निहाय हस्तांतरण करुन ठेवणे आवश्यक आहे. लेखापत्रक नमुना-22 व नमुना-24 नोकर पगार वाटप रजिस्टरचे विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी सत्यता पडताळनी अहवाल वाटप केल्याचा अहवाल प्रमाणका सोबत सलंग्न करणे आवश्यक आहे.

4) पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायत निहाय सरपंच व सदस्य यांच्या माहिती बाबतची नोंदवही ठेवली नाही. तसेच ग्रामपंचायत स्तरावर सरपंच मानधन व बैठक भत्ता अदाई केल्याचे दिसून आले आहे. याबाबत विस्तार अधिकारी (पंचायत) यानी खात्री केले बाबतची अभिलेखे लेखापरिक्षणात सादर केले नसल्याचे दिसून येते.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 77 (2) नुसार प्रत्येक प्रदानाची पोंचपावती मिळविण्यात येईल व ती संवितरण अधिकाऱ्याकडून सांक्षाकित करण्यात येईल असे स्पष्ट असतांना वाटपाच्या पोचपावत्या दर्शविण्यात आल्या नाही.

6) ग्रामपंचायत सदस्य बैठक भत्ता प्रदान करतांना ग्रामपंचायतीचे एकूण सदस्य संख्या दर्शवुन रक्कम आहरण करुन पारीत केले आहे. परंतु दरमहा सर्व सदस्य बैठकीत उपस्थित असले बाबत उपस्थिती पत्रक, ठराव संचिका दर्शविण्यात आली नाही.

**4.39 गाडी क्र.MH-26 F 7085 चे भाडे प्रदानातील अनियमितता.**

**पंचायत समिती उमरी, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रुपये 53,200/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती उमरीचे सन 2015-16 चे लेखापरीक्षणात गटविकास अधिकारी, पंचायत समिती उमरी यांनी तालुका अंतर्गत कामांची पाहणी करण्यासाठी श्री.देशमुख प्रकाश मोतीराम रा.बलेगाव पो. कवलगाव तालुका देगलूर जिल्हा नांदेड यांची गाडी क्र.MH 26 F 7085 प्रति दिवस भाडे रुपये 1,300/- प्रमाणे भाडेपट्टीवर घेतले. भाडे ठरविण्यासाठी मोटर वाहन विभागा (RTO) यांचेकडून वाहनाचे भाडे दर मागविले नाहीत. तसेच खुल्या बाजारातून

दरपत्रके मागवून वाहन भाडेपट्टीवर घेतलेले नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा मिळाला नाही व जादा प्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक-2014/प्र.क्र.82/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 अन्वये रुपये 5,000/- पेक्षा जादा खर्चासाठी दरपत्रके मागविणे आवश्यक असताना नियमानुसार कार्यवाही केलेली नाही.

2) सदर वाहन कोणत्या कालावधीसाठी भाडेपट्टीवर घेणार आहे. याचा उल्लेख संचिकेत दिसून आला नाही. व तसा करारनामा केल्याचे दिसून आले नाही.

**4.40 3 टक्के रक्कम अपंग व्यक्तींच्या कल्याण व पुनर्वसनाकरिता खर्च न केलेबाबत. (परिच्छेद क्रमांक 39)**
**पंचायत समिती स्वत:च्या उत्पन्नातुन 20 टक्के मागासवर्गीय यांच्या कल्याणार्थ खर्च न करणेबाबत. (परिच्छेद क्रमांक 40)**
**पंचायत समिती स्वत:च्या उत्पन्नातुन 10 टक्के महिला व बालकल्याण खर्च न केल्याबाबत. (परिच्छेद क्रमांक 71)**

**पंचायत समिती माहूर, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 -** पंचायत समिती माहुरच्या सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात पंचायत समितीने स्वताच्या उत्पन्नातून 3 टक्के रुक्कम अपंग व्यक्तींच्या कल्याण व पुनर्वसनाकरिता खर्च केल्याचे दिसून आले नाही.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2007/प्र.क्र.4871/ वित्त-3, दिनांक 05/10/2012 अन्वये जिल्हा परिषदेने / पंचायत समितीने आपल्या स्वताच्या उत्पन्नाच्या 3 टक्के रुक्कम अपंग व्यक्तींच्या कल्याण व पुनर्वसनाकरिता खर्च करणे आवशक होते. तथापि पंचायत समितीने सन 2015-2016 मध्ये काहीच खर्च केला नाही.

2) पंचायत समीती उपकरातुन -14 समाजकल्याण या लेखाशीर्षा अंतर्गत रुपये 1,95,000/- ची तरतुद असताना खर्च मात्र निरंक आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक मागास/ 1098/प्र.क्र.34/73, दिनांक 20/10/1999 नुसार पंचायत समिती ने त्यांच्या उत्पन्नाच्या 20 टक्के रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी खर्च करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही या बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) पंचायत समिती माहुर सन 2015-2016 या वित्तीय वर्षात स्वतःच्या उपकर निधी मधुन किमान 10 टक्के रक्कम महिला व बालकल्याणासाठी खर्च केलेली नाही. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेड.पी.ए/2001/10-प्र.क्र.05/208, दिनांक 06/11/2001 नुसार पंचायत समितीने स्वतःच्या उत्पन्नातून 10 टक्के रक्कम महिला व बालकल्याणा खर्च करणे आवश्यक आहे. परंतु पंचायत समितीने काही खर्च केले नाही.

**4.41 ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन प्रतीपूर्ती खर्चासाठी देय अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती उमरगा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** उमरगा पंचायत समिती प्रमाणक क्रमांक 524, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 25,41,100/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम-2012/प्र.क्र.235/परा-3, दिनांक 04/03/2014 नुसार, ग्रामपंचायत कर्मचा-यांना किमान वेतन वाटप करण्यापूर्वी ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न व लोकसंख्या विचारात घेवून मानधन वितरीत करावायाचे आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार रुपये 2 लक्ष पर्यंत उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना 100 टक्के शासन हिस्सा अनुज्ञेय आहे, रुपये 2 लक्ष ते रुपये 5 लक्ष पर्यंत उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना 75 टक्के शासन हिस्सा अनुज्ञेय आहे. व उर्वरीत सर्व ग्रामपंचायतींना 50 टक्के प्रमाणे शासन हिस्सा अनुज्ञेय आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही न करता पंचायतीने रक्कम रुपये 13,26,675/- जादा अदाई केली आहे. जादा अदाईची रक्कम वसुल करुन शासनखाती भरणा करावी.

**4.42 जनसुविधा योजने अंतर्गत रद्द केलेल्या व इतर कारणामुळे निष्फळ ठरलेल्या बांधकामाची रक्कम शासनखाती जमा न करणे व इतर अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 54) -** पंचायत समिती तुळजापुर सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात जनसुविधा योजना मासिक प्रगती अहवाल व अभिलेखे तपासता गंभिर अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1) जनसुविधा योजने अंतर्गत स्मशानभुमी शेड बांधकामासाठी रुपये 5,46,000/- प्रदान केलेले आहेत. तथापि ग्रामपंचायतीने सदरचे कामे न करता कामे अर्धवट ठेवणे, अपहार, वसुलीची कार्यवाही प्रस्तावित केल्यामुळे रक्कम रुपये 5,46,000/- वसूल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक होते. तथापि पंचायत समितीने वसुली करुन रक्कम रुपये 5,46,000/- शासनखाती जमा केलेली नाही. सदरची रक्कम रुपये 5,46,000/- वसुल करुन शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 कलम 98 (2) (घ) नुसार गटविकास अधिकारी यांनी सर्व कामांचे व विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही न केल्यामुळे एकुण 6 कामे अपुर्ण अवस्थेत राहिल्यामुळे शासननिधीचे नुकसान झालेले आहे.

**4.43 ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन प्रतीपूर्ती खर्चासाठी देय अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती परांडा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** परंडा पंचायत समिती प्रमाणक क्रमांक 03, दिनांक 02/11/2015 अन्वये रक्कम रुपये 29,58,600/- खर्च करण्यात आला आहे. यामध्ये खालीलप्रमाणे उणिवा आढळून आल्या आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम-2012/प्र.क्र.235/परा-3, दिनांक 04/03/2014 नुसार, ग्रामपंचायत कर्मचा-यांना किमान वेतन वाटप करण्यापूर्वी ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न व लोकसंख्या विचारात घेवून मानधन वितरीत करावायाचे आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार रुपये 2 लक्ष पर्यंत उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतींना 100 टक्के शासन हिस्सा अनुज्ञेय आहे. रुपये 2 लक्ष ते रुपये 5 लक्ष पर्यंत उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतींना 75 टक्के शासन हिस्सा अनुज्ञेय आहे. व उर्वरीत सर्व ग्रामपंचायतींना 50 टक्के प्रमाणे शासन हिस्सा अनुज्ञेय आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही न करता पंचायतीने रक्कम रुपये 2,29,500/- जादा अदाई केली आहे. जादा अदाईची रक्कम वसुल करुन शासनखाती भरणा करावी.

**4.44 ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन प्रतीपूर्ती खर्चासाठी देय अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती भूम, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** भुम पंचायत समिती प्रमाणक क्रमांक 114, दिनांक 30/03/3016 अन्वये रक्कम रुपये 40,44,800/- खर्च करण्यात आला आहे. यामध्ये खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम-2012/प्र.क्र.235/परा-3, दिनांक 04/03/2014 नुसार, ग्रामपंचायत कर्मचा-यांना किमान वेतन वाटप करण्यापूर्वी ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न व लोकसंख्या विचारात घेवून मानधन वितरीत करावायाचे आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार रुपये 2.00 लक्ष पर्यंत उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना 100 टक्के शासन हिस्सा अनुज्ञेय आहे, रुपये 2.00 लक्ष ते रुपये 3.00 लक्ष पर्यंत उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना 75 टक्के शासन हिस्सा अनुज्ञेय आहे व उर्वरीत सर्व ग्रामपंचायतींना 50 टक्के प्रमाणे शासन हिस्सा अनुज्ञेय आहे. तथापि, याप्रमाणे किमान वेतनाची परिगणना न करता सरसकट 100 टक्के प्रमाणे किमान वेतनाची अदायगीची कार्यवाही करण्यात आल्याने जादा रक्कम अदाई केली आहे. जादा अदाईची रक्कम रुपये 3,49,500/- वसुल करुन शासन खाती भरणा केल्याचे दर्शवावे.

**4.45 जनसुविधा योजने अंतर्गत निष्फळ ठरलेल्या बांधकामाची रक्कम शासनखाती जमा न करणे व इतर अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती भूम, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती भुम सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात जनसुविधा योजना मासीक प्रगती अहवाल व अभिलेखे तपासता गंभिर अनियमितता आढळून आलेल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जनसुविधा योजने अंतर्गत स्मशानभुमी शेड बांधकाम वांगी बु. बांधकामासाठी रुपये 2,40,000/- प्रदान केलेले आहेत. तथापि ग्रामपंचायतीने सदरचे कामे न करता कामे अर्धवट ठेवल्यामुळे सदर कामावरिल खर्च निष्फळ ठरला आहे. सदरची रक्कम रुपये 2,40,000/- वसुल करुन शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 कलम 98 (2) (घ) नुसार गटविकास अधिकारी यांनी सर्व कामांचे व विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही न केल्यामुळे काम अपुर्ण अवस्थेत राहिल्यामुळे शासननिधीचे नुकसान झालेले आहे.

**4.46 ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन प्रतिपुर्ती खर्चासाठी देय अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत (माहे 3/2015 ते 10/2015)**

**पंचायत समिती लोहारा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती लोहारा व्दारा ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन रक्कम रुपये 2,60,600/- अदायी केलेली आहे. यामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळुन आली.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम-2012/प्र.क्र.235/परा-3, दिनांक 04/03/2014 नुसार, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन वाटप करण्यापूर्वी ग्रामपंचायतीचे वार्षीक उत्पन्न व लोकसंख्या विचारात घेवून मानधन वितरीत करावयाचे आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार रुपये 2.00 लक्ष पर्यंत उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतींना 100 टक्के शासन हिस्सा अनुज्ञेय आहे, रुपये 2.00 लक्ष ते 5.00 लक्ष पर्यंत उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतींना 75 टक्के शासन हिस्सा अनुज्ञेय आहे व उर्वरीत सर्व ग्रामपंचायतींना 50 टक्के प्रमाणे शासन हिस्सा अनुज्ञेय आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही न करता पंचायतीने जादा अदाई केली आहे.

**4.47 20 टक्के इतकी रक्कम मागासवर्गीय कल्याण कार्यक्रमाकरिता राखुन ठेवून खर्च न करणेबाबत.**

**पंचायत समिती लोहारा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 31) -** सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समितीने मागासवर्गीय कल्याण कार्यक्रमांतर्गत कोणतीच योजना राबविलेली नाही.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार पंचायत समितीने आपल्या स्वउत्पन्नातून किमान 20 टक्के इतकी रक्कम मागासवर्गीय कल्याण कार्यक्रमाकरिता राखुन ठेवुन कार्यक्रमावर खर्च करावयास पाहीजे. परंतु पंचायत समितीने स्वउत्पन्नाच्या अंदाजपत्रकात अशी तरतुद केलेली नाही व प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्रानुसार असा खर्च केलेला नाही.

2) त्याचप्रमाणे मागील वर्षांचा अनुशेष असल्यास तो समाविष्ट करुन पुढील वर्षाचे अंदाजपत्रकात तयार करावे व अनुशेषासह रक्कम मागासवर्गीय कल्याण कार्यक्रमावर खर्च करुन पुर्तता दर्शवावी.